- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४८,७०० /-
✔ २३ कॅरेट : १,३६,३५० /-
✔ चांदी : २,४८,३००/-

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, ८ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २९९ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग
अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# दुसऱ्या दिवशीही जंतरमंतरवर रणकंदन

## राहुल आणि प्रियंका गांधी यांना बसमूधन खाली उतरवले



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आज दिल्लीत विरोधी पक्षांनी पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसले. राहुल गांधी आणि इंडिया आघाडीचे नेते बसने जंतरमंतरकडे निघाले होते. परंतु पोलिसांनी त्यांना अडवले. त्यानंतर पोलिसांनी राहुल आणि प्रियंका गांधी यांना बसमूधन खाली उतरवले. घटनास्थळी मोठी गर्दी जमली. जंतरमंतरवर आंदोलन करण्यावर विरोधक ठाम राहिले. त्यामुळे राहुल गांधींसह खासदार आणि नेतेमंडळींना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले.
रस्त्यावर झोपून रास्ता रोको करण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रियंका गांधी आणि इतर महिला खासदार आंदोलकांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आणि आंदोलनस्थळापासून दूर नेले.
काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी आज इंडिया आघाडीच्या खासदारांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर हे सर्व खासदार ३ बस भरून २०० पेक्षा जास्त खासदार दिल्लीच्या जंतरमंतर मैदानाकडे निघाले. परंतु या मैदानापासून १०० मीटर अंतरावर पोलिसांनी या बस अडवल्या. पोलिसांनी राहुल गांधींना आंदोलन करण्यापासून अटकाव केल्यानंतर राहुल गांधींनी त्याच ठिकाणी ठिय्या मांडला. प्रियंका गांधीही यावेळी रस्त्यावर आडव्या पडल्या. पोलिसांनी आपल्यासह इतर खासदारांना मारहाण केल्याचा आरोपही त्यांनी केला.
जंतरमंतरवर जाणाऱ्या बसेस रोखल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांनी तीव्र संताप व्यक्त झाला. पोलिसांनी बसेस अडविण्यासाठी बॅरिकेटिंग केले आणि काही बसेसच्या टायरमधील हवाही काढल्याचे समोर आले. सुमारे दीड तास बसेस पुढे सरकत नसल्याने राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि इतर खासदार बसमधून खाली उतरले. त्यांनी पायीच जंतरमंतरकडे जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्यांनाही बॅरिकेटिंग करून पुढे जाण्यापासून रोखले.
या परिस्थितीनंतर राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी कार्यकर्त्यांना त्याच ठिकाणी ठिय्या देण्याचे आवाहन केले. त्यानंतर काँग्रेसचे कार्यकर्ते आणि इंडिया आघाडीचे खासदार अडवलेल्या ठिकाणीच ठिय्या देऊन बसले. दरम्यान, पोलिसांनी राहुल गांधींना आंदोलन करू नये, यासाठी मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. मात्र राहुल गांधी आंदोलनावर ठाम होते. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. आधी राहुल गांधी यांना ताब्यात घेतले. त्यानंतर प्रियंका गांधी यांच्यासह इतर खासदारांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले.
निवडणूक आयोग आणि ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात हे आंदोलन करण्यात येत होते. या घटनेमुळे दिल्लीतील राजकीय वातावरण तापले असून, पोलिसांनी आंदोलकांना नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केले. या आधी काल मंगळवारी इंडिया आघाडीच्या खासदारांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या घराला घेराव घालण्यासाठी मोर्चा काढला. त्यावेळी पोलिसांनी बॅरिकेड्स लावून मोर्चा अडविला. त्यावेळी राहुल गांधी यांच्यासह इतर खासदारांनी आकाशवाणी भवनात रात्री उशिरापर्यंत ठिय्या आंदोलन केले. त्यानंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन सोडून दिले. त्यामुळे गेल्या २४ तासांत पोलिसांनी राहुल गांधी आणि इतर खासदारांना दुस-यांदा ताब्यात घेतले.

### प्रत्येक एफआयआर माझ्यासाठी मेडल
जंतरमंतरवर आंदोलनासाठी निघताना राहुल गांधींनी माध्यमांशी बोलताना माझ्यावर ४५ गुन्हे दाखल आहेत. माझ्यावर १०० गुन्हे दाखल झाले तरी चालेल, ते माझ्यासाठी मेडल आहेत, असे राहुल गांधी यांनी सांगितले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांच्यावर देशात विविध भागांत मिळून १८ गुन्हे दाखल होते.

### इंडिया आघाडीच्या मागण्या
-मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटविण्यासाठी संसदेत प्रस्ताव आणावा.
-एसआयआर प्रक्रियेत मतदार यादीतून वगळण्यात आलेली नावे सार्वजनिक करावीत.
-नावे वगळण्यापूर्वी मतदाराला नोटीस आणि अपील करण्याची संधी मिळावी. ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेद्वारे निवडणुका घेण्यात याव्यात.

थोडक्यात

## ईडीचे केरळममध्ये २० ठिकाणी छापे
**कोच्ची :** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) केरळममधील तीन सहकारी संस्थांमधील अंदाजे ९२ कोटी रुपयांच्या कथित अनियमिततेच्या तपासाचा भाग म्हणून थ्रिसूर, एनार्कुलम आणि कोझिकोडमधील २० ठिकाणी छापे टाकले. या तपासात अर्बन कोऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये ५५ कोटी रुपये, थेन्नेला सर्व्हिस कोऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये १० कोटी रुपये आणि कुट्टनेलूर कोऑपरेटिव्ह बँकेत २७ कोटी रुपयांची अनियमितता उघड झाली आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, मनी लाँड्रिंग आणि आर्थिक फसवणुकीच्या आरोपांखाली ही कारवाई केली जात आहे.
९२ कोटी रुपयांच्या कथित अनियमिततेप्रकरणी ईडीने केरळममध्ये २० ठिकाणी छापे टाकले. तीन सहकारी संस्थांमधील अंदाजे ९२ कोटी रुपयांच्या कथित अनियमिततेच्या तपासाचा भाग म्हणून ईडीने बुधवारी केरळममधील अनेक ठिकाणी छापे टाकले. ईडीची पथके थ्रिसूर, एनार्कुलम आणि कोझिकोडमधील अंदाजे २० ठिकाणी शोधमोहीम राबवत आहेत. चौकशी होत असलेल्या तीन सोसायट्यांमध्ये अर्बन कोऑपरेटिव्ह सोसायटी मधील ५५ कोटी रुपये, थेन्नेला सर्व्हिस कोऑपरेटिव्ह सोसायटी मधील १० कोटी रुपये आणि कुट्टनेलूर कोऑपरेटिव्ह बँकेमधील २७ कोटी रुपयांच्या कथित अनियमिततेचा समावेश आहे.

# १५० प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या विमानावर कोसळली वीज

**वृत्तसंस्था, उत्तर प्रदेश**
उत्तर प्रदेशमधील लखनौमधून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. टेकऑफच्या वेळी इंडिगोच्या विमानावर वीज पडल्याची घटना घडली आहे. यानंतर विमानाचे आपत्कालीन लँडिंग करण्यात आलं आहे. वीज पडल्यामुळं विमानाच्या पुढील भागाचं मोठं नुकसान झालं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या विमानात १५० प्रवासी होते. दरम्यान, या घटनेमुळं खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर काही काळ प्रवाशांच्या मनामध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. वैमानिक चौधरी चरण सिंग यांनी सुरक्षितपणे विमान विमानतळावर फतरवले. उड्डाणादरम्यान विमानावर वीज पडल्याती धक्कादायक घटना लखनौमध्ये घडली आहे. यानंतर



आपत्कालीन लँडिंग करावे लागले.
विमानाच्या पुढील भागाचे नुकसान झाले आहे. दरम्यान, वैमानिकाने चौधरी चरण सिंग यांनी आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमान सुरक्षितपणे उतरवले. मात्र, या घटनेमुळे विमानात असलेल्या सुमारे १५० प्रवाशांमध्ये काही काळासाठी घबराट पसरली आहे. या घटनेनंतर विमान सेवेच्या उड्डाणांवरही परिणाम झाला आहे. इंडिगोचे नियोजित देशांतर्गत विमान ६-एई२५ हे दुपारी ३ वाजून १० मिनीटांनी पाटणा येथून लखनौसाठी निघाले होते. ते दुपारी ४ वाजून २० मिनिटांनी लखनौला पोहोचणार होते, परंतु खराब हवामानामुळे विमान दुपारी ४ वाजून ५ मिनिटांच्या सुमारास लखनौ विमानतळावर उतरले. लखनौला पोहोचल्यानंतर, तेच विमान इंडिगो फ्लाइट सायंकाळी ५ वाजून ५ मिनिटांनी अहमदाबादसाठी निघणार होते. मात्र विमानाची तपासणी करताना एक तांत्रिक बिघाड आढळून आला. त्यानंतर विमान विमानतळावर थांबवून ठेवण्यात आले. लखनौच्या जवळ पोहोचत असताना, विमान अंदाजे १७ हजार फूट उंचीवर असताना त्यावर वीज पडल्याची माहिती मिळाली आहे.
वीज पडूनही, विमानसेवा सामान्यपणे सुरू राहिली आणि वैमानिकाने कोणत्याही अडचणीशिवाय विमान विमानतळावर उतरवले. सर्व प्रवासी सुरक्षित असल्याची माहिती सांगण्यात आली आहे. लखनौमध्ये पोहोचल्यानंतर, तेच विमान इंडिगो फ्लाइट सायंकाळी अहमदाबादसाठी रवाना होणार होते. मात्र, तपासणीदरम्यान एक तांत्रिक बिघाड आढळून आला.

# नागपूर विभागातील २८ महसूल कर्मचाऱ्यांना पदोन्नती, नायब तहसीलदार संवर्गात पदोन्नती

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
नागपूर विभागातील सहायक महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी संवर्गातील २८ कर्मचाऱ्यांना नायब तहसीलदार (गट-ब, राजपत्रित) संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करण्याचा निर्णय घेतला.



यामध्ये २३ कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नती, यापूर्वी तदर्थ पदोन्नती मिळालेल्या ४ कर्मचाऱ्यांची पदोन्नती नियमित, तर दिव्यांग प्रवर्गातील एका कर्मचाऱ्याला काल्पनिक पदोन्नती मंजूर करण्यात आली आहे.
सन २०२५-२६ च्या निवडसूचीतून ८ सहायक महसूल अधिकारी आणि १५ मंडळ अधिकारी, अशा एकूण २३ कर्मचाऱ्यांना नायब तहसीलदार संवर्गात नियमित पदोन्नती देण्यात आली आहे. पदोन्नती कोट्यातील उपलब्ध पदांवर ही पदोन्नती देण्यात आली असून संबंधित कर्मचाऱ्यांच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येणार आहेत.
याशिवाय सन २०२३-२४ च्या निवडसूचीतून यापूर्वी नायब तहसीलदार संवर्गात तदर्थ पदोन्नती मिळालेल्या ४ सहायक महसूल अधिकाऱ्यांची पदोन्नती सन २०२५-२६ च्या पदोन्नती कोट्यात नियमित करण्यात आली आहे. तसेच दिव्यांग प्रवर्गातील एका सहायक महसूल अधिकाऱ्याला नायब तहसीलदार संवर्गात काल्पनिक पदोन्नतीचा मानीव दिनांक मंजूर करण्यात आला आहे. या पदोन्नती विविध अटींच्या अधीन राहून देण्यात आल्या असून संबंधित न्यायालयीन प्रकरणांच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहणार आहेत.
महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महसूल विभागातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे प्रश्न वेळेत मार्गी लागणे महत्त्वाचे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार नागपूर विभागातील पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीची संधी मिळाली असून महसूल प्रशासनाचे काम अधिक प्रभावीपणे पुढे नेता येईल.

# रशियाचे युक्रेनवर भीषण क्षेपणास्त्र हल्ले



**वृत्तसंस्था, किव्ह**
रशिया आणि युक्रेनमधील युद्ध दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहे. आता रशियाने युक्रेनवर मोठा हल्ला केला आहे. रशियाच्या सैन्याने शस्त्रे आणि ड्रोनचा वापर करून कीव आणि युक्रेनमधील इतर अनेक प्रदेशांमधील लष्करी-औद्योगिक सुविधांवर मोठा हल्ला चढवला आहे. या हल्ल्यांमध्ये जमिनीवरून, समुद्रातून आणि हवेतून डागण्यात येणाऱ्या शस्त्रास्त्रांचा तसेच मोठ्या प्रमाणावर ड्रोनचा प्रभावी वापर करण्यात आल्याची माहिती रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने बुधवारी दिली. रशियाने केलेल्या या आक्रमक कारवाईमुळे युक्रेनमध्ये मोठी खळबळ उडाली असून या भीषण हल्ल्यांमध्ये युक्रेनमध्ये किमान ११ जण ठार झाल्याचे सांगण्यात येत आहे.
मंत्रालयाच्या माहितीनुसार, या हल्ल्यांमध्ये कीवमधील फायर पॉइंटद्वारे चालवल्या जाणाऱ्या सुविधांचा प्रामुख्याने समावेश होता, जिथे फ्लेमिंगो क्रूझ क्षेपणास्त्रे, मध्यम व लांब पल्ल्याचे ड्रोन तयार करून साठवले जातात. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, कीवशिवाय चेर्निहीव, किरोवोग्राद, ड्निप्रोपेत्रोव्स्क, पोल्टावा आणि खार्किव प्रदेशांमधील लष्करी-औद्योगिक स्थळांनाही रशियन सैन्याने आपल्या हल्लूयात लक्ष्य केले आहे. दरम्यान, रशियाने देशाच्या ऊर्जा पायाभूत सुविधांना विशेष लक्ष करून ड्रोनसह सुमारे ७० क्षेपणास्त्रे डागली, अशी माहिती युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर झेलेन्स्की यांनी दिली आहे.
या भीषण हल्ल्यांमध्ये युक्रेनमध्ये किमान ११ जण ठार झाल्याचे समोर आले आहे. ऊर्जा पायाभूत सुविधा हे मुख्य लक्ष्यांपैकी एक असल्याचे सांगत, या हल्ल्याद्वारे मोठे नुकसान पोहोचवण्याचा आणि एक कडक संदेश देण्याचा रशियाचा स्पष्ट प्रयत्न असल्याचा गंभीर आरोप झेलेन्स्की यांनी केला आहे.

### देशासाठी अतिरिक्त हवाई संरक्षण प्रणाली
टेलिग्रामवरील एका पोस्टमध्ये झेलेन्स्की यांनी म्हटले की आमच्या ऊर्जा पायाभूत सुविधा हे प्रमुख लक्ष्यांपैकी एक होते आणि रशियन सैन्याला मोठा हल्ला करायचा होता. तसेच रशियन बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे हे सध्या युक्रेनपुढील सर्वात मोठे आव्हान असल्याचे सांगत देशासाठी अतिरिक्त हवाई संरक्षण प्रणाली ही आता अत्यंत अत्यावश्यक गरज बनली आहे अशी आक्रमक मागणी त्यांनी केली आहे.

# आरबीआयने रेपो रेट २५ पॉईटने वाढविला

**वृत्तसंस्था, मुंबई**
केंद्रीय रिझर्व्ह बँकेने रेपो दरात वाढ केली आहे. आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी बुधवारी तीन दिवसीय एमपीसी (मनी पॉलिसी कमिटी) बैठकीचा निकाल जाहीर केला. त्यांनी सांगितले की, रेपो दरात २५ बेसिस पॉइंट्सची वाढ करण्यात आली असून तो ५.२५% वरून ५.५०% झाला आहे. यामुळे गृहकर्ज, वाहन कर्ज आणि वैयक्तिक कर्जाचे दर वाढू शकतात. आरबीआयने व्याजदर वाढवल्याने ईएमआय वाढणार आहे.
एखाद्या व्यक्तीने बँकेकडून २० लाख रुपयांचे गृहकर्ज घेतले आहे आणि या कर्जावरील व्याजदर सध्या ७.५% आहे. २० वर्षांच्या कालावधीसाठी, हप्ता (ईएमआय) १६,११२ रुपये येतो. परंतु आरबीआयच्या २५ बेसिस पॉइंट, म्हणजेच ०.२५% व्याजदर वाढीनंतर, हा दर ७.७५% पर्यंत जाईल. याचा हिशोब केल्यास, त्याला २० लाख रुपयांच्या कर्जावर दरमहा १६,४१९ रुपयांचा हप्ता भरावा लागेल. याचा अर्थ त्याला दरमहा ३०७ रुपये जास्त भरावे लागतील. जर एखाद्या व्यक्तीने २० वर्षांसाठी ७.५० टक्के व्याजदराने ३० लाख रुपयांचे कर्ज घेतले, तर त्यांना दरमहा २४,१६८ रुपयांचा ईएमआय भरावा लागेल. तथापि, आरबीआयने व्याजदर २५ बेसिस पॉइंट्सने वाढवल्यानंतर, त्यांचा मासिक ईएमआय ७.७५ टक्के दराने २४,६२८ रुपयांपर्यंत वाढेल.
याचा अर्थ त्यांना दरमहा ४६० रुपये अधिक भरावे लागतील. जर एखाद्या व्यक्तीने या रकमेचे बँकेकडून २० वर्षांसाठी ७.५ टक्के व्याजदराने कर्ज घेतले, तर त्यांना सध्या ४०,२८० रुपयांचा मासिक ईएमआय भरावा लागेल. परंतु जर कर्जावरील व्याजदर ७.७५ टक्के असेल, तर हा ईएमआय वाढून ४१,०४७ रुपये होईल. याचा अर्थ कर्जदाराला दरमहा ७६७ रुपये अधिक भरावे लागतील.

# दिल्लीत ५ मजली इमारत कोसळली, १ ठार; अनेक जण ढिगाऱ्याखाली



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
दिल्लीच्या ईशान्य भागातील सीमापुरी परिसरात बुधवारी दुपारी एक मोठी दुर्घटना घडली. साडेतीन वाजण्याच्या सुमारास एक ५ मजली जुनी इमारत अचानक कोसळली. या भीषण दुर्घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अनेक नागरिक ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या चार गाड्या दाखल झाल्या असून बचावकार्य सुरू आहे. या दुर्घटनेबद्दल सविस्तर वृत्त दी इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.

### २ ते ३ जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता
शाहदरा विभागाचे पोलीस उपायुक्त राजेंद्र प्रसाद मीणा यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक नागरिकांच्या मदतीने काही जणांना ढिगाऱ्यातून सुखरूप बाहेर काढून तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र, अद्यापही २ ते ३ जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता आहे. ते ढिगाऱ्याखालून आतून बोलत असून त्यांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे, असे पोलिसांनी सांगितले.
दरम्यान, स्थानिक नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेत ४ ते ५ जणांना बाहेर काढले. त्यातील एका नागरिकाने जखमी व्यक्तीला तातडीने सीपीआर देऊन जीव वाचवण्याचा प्रयत्न केल्याचेही समोर आले आहे.

संपादकीय लेखणीतून...

## इन्स्टाग्राम

इन्स्टाग्रामची स्थापना दि. ६ ऑक्टोबर २०१० रोजी केविन सिस्ट्रॉम आणि माईक क्रिगेर यांनी केली. इन्स्टाग्रामबद्दल महत्त्वाची माहिती अशी की, मूळ स्थानः सॅन फ्रान्सिस्को, अमेरिका नाव कसे पडले? तर इन्स्टंट आणि टेलिग्राम या दोन शब्दांपासून "इन्स्टाग्राम" हे नाव तयार झाले. मालकी कंपनीः एप्रिल २०१२ मध्ये फेसबुक- आता मेटा प्लॅटफॉर्म्स कंपनीने इन्स्टाग्राम १ अब्ज अमेरिकन डॉलरला विकत घेतले. मुख्य उपयोगः फोटो आणि व्हिडिओ शेअर करणे. इन्स्टाग्राम हे ऑनलाईन आपण त्याने आपल्या मोबाईल मार्फत फोटो शेअर करण्याचे एक अ‍ॅप आहे. मेटा प्लॅटफॉर्म्स कंपनी- पूर्वीची फेसबुक या अ‍ॅपची मालक आहे. केविन शिस्ट्रोम आणि मॅक क्रीगर यांनी ऑक्टोबर २०१० साली याची निर्मिती केली होती. एप्रिल २०१२ मध्ये या अ‍ॅपच्या वापरकर्त्यांची संख्या १० कोटी होती आणि डिसेंबर २०१४ला ती संख्या ३० कोटी झाली. हे अ‍ॅप अँड्रॉइड, आयफोन, आयपॅड, नोकिया या ऑपरेटिंग सिस्टिमवर चालते. याला एप्रिल २०१२ फेसबुक कंपनीने १ अब्ज अमेरिकन डॉलरला विकत घेतले आहे.

इंस्टाग्राम ही मेटा प्लॅटफॉर्म्सच्या मालकीची एक अमेरिकन फोटो आणि शॉर्ट-फॉर्म व्हिडिओ शेअरिंग सोशल नेटवर्किंग सेवा आहे. हे वापरकर्त्यांना मीडिया अपलोड करण्याची परवानगी देते जे फिल्टर्ससह संपादित केले जाऊ शकते, हॅशटॅगद्वारे आयोजित केले जाऊ शकते आणि भौगोलिक टॅगिंगद्वारे स्थानाशी जोडले जाऊ शकते. पोस्ट सार्वजनिकरित्या किंवा पूर्व-मंजूर फॉलोअर्ससह शेअर केल्या जाऊ शकतात. वापरकर्ते टॅग आणि स्थानांनुसार इतर वापरकर्त्यांची सामग्री ब्राउझ करू शकतात, ट्रेंडिंग सामग्री पाहू शकतात, फोटो लाइक करू शकतात आणि इतर वापरकर्त्यांना फॉलो करून त्यांची सामग्री वैयक्तिक फीडमध्ये जोडू शकतात. मेटा-संचालित इमेज-केंद्रित सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, हे आइओएस, एंड्राइड, विण्डोज आणि वेबवर उपलब्ध आहे. वापरकर्ते फोटो काढू शकतात आणि अंगभूत फिल्टर्स आणि इतर साधनांचा वापर करून ते संपादित करू शकतात, त्यानंतर ते फेसबुकसारख्या इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर करू शकतात. हे इंग्रजी, हिंदी, स्पॅनिश, फ्रेंच, जपानी आणि कोरियनसह ३३ भाषांना समर्थन देते .

इन्स्टाग्राम हे फोटो आणि व्हिडिओ शेअर करण्यासाठी असलेले एक ऑनलाइन सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि सोशल नेटवर्क सेवा आहे. हे अ‍ॅप २०१० मध्ये सह-संस्थापकांनी सुरू केले होते. केविन सिस्ट्रॉम आणिमाईक क्रिगर यांनी याची स्थापना केली होती आणि आता ती फेसबुकची मूळ कंपनी असलेल्या मेटा प्लॅटफॉर्म्स, इंकच्या मालकीची आहे. जगातील सर्वात मोठ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या इन्स्टाग्रामने २०२२ मध्ये दोन अब्ज मासिक सक्रिय वापरकर्त्यांचा टप्पा ओलांडला. कंपनीचे मुख्यालय कॅलिफोर्नियातील मेनलो पार्क येथे आहे.

इतिहासः इन्स्टाग्रामची सुरुवात स्टॅनफोर्ड पदवीधर केविन सिस्ट्रॉम यांनी केली, जे पूर्वी गुगलमध्ये काम करत होते. त्यांची सुरुवातीची निर्मिती "बर्बन' होती, जे नाव त्यांना व्हिस्की आणि बर्बनमध्ये असलेल्या आवडीमुळे देण्यात आले होते. फोरस्क्वेअर आणि इतर लोकेशन आधारित प्लॅटफॉर्मच्या लोकप्रियतेपासून प्रेरित होऊन, बर्बनने वापरकर्त्यांना फोटोंसोबत चेक-इन पोस्ट करण्याची परवानगी दिली, जे त्यावेळी सोशल पोस्टिंगचा एक अविभाज्य भाग नव्हते. सिस्ट्रॉम यांनी बर्बनसाठी व्हेंचर फंडिंग मिळवले आणि पुढे स्टॅनफोर्डचेच दुसरे पदवीधर माईक क्रिगर यांना सोबत घेतले, ज्यांनी "मीबो" या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर काम केले होते. त्यांनी मोबाईल उपकरणांवर काढलेल्या फोटोंवर लक्ष केंद्रित करण्यासाठी या संकल्पनेत बदल केला आणि त्याचे नाव बदलून "इन्स्टाग्राम" असे ठेवले.

उद्योगः संवादात्मक माध्यमे आणि सेवा- मुख्य कार्यकारी अधिकारीः श्री. मार्क इलियट झुकरबर्ग- इस्लामविरोधी इंस्टाग्राम कमेंटनंतर झालेल्या परिणामांची व्याप्ती सेल्मा ब्लेअर यांनी उघड केलीः "माझं करिअरच संपलं होतं."

इन्स्टाग्राम हे फोटो आणि व्हिडिओ शेअर करण्यासाठी असलेले एक ऑनलाइन सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि सोशल नेटवर्क सेवा आहे. हे अ‍ॅप २०१० मध्ये सह-संस्थापकांनी सुरू केले होते. केविन सिस्ट्रॉम आणि माईक क्रिगर यांनी याची स्थापना केली होती आणि आता ती फेसबुकची मूळ कंपनी असलेल्या मेटा प्लॅटफॉर्म्स, इंकच्या मालकीची आहे. जगातील सर्वात मोठ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या इन्स्टाग्रामने २०२२ मध्ये दोन अब्ज मासिक सक्रिय वापरकर्त्यांचा टप्पा ओलांडला. कंपनीचे मुख्यालय कॅलिफोर्नियातील मेनलो पार्क येथे आहे.

इतिहास : इन्स्टाग्रामची सुरुवात स्टॅनफोर्ड पदवीधर केविन सिस्ट्रॉम यांनी केली, जे पूर्वी गुगलमध्ये काम करत होते. त्यांची सुरुवातीची निर्मिती "बर्बन" होती, जे नाव त्यांना व्हिस्की आणि बर्बनमध्ये असलेल्या आवडीमुळे देण्यात आले होते.

# इंधनाचे अर्थकारण आणि भारताचे सार्वभौमत्वः जागतिक दबावाला चोख प्रत्युत्तर

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

इंधनाचे अर्थकारण हे केवळ व्यापार किंवा अर्थव्यवस्थेपुरते मर्यादित नसून, ते कोणत्याही देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेशी आणि सार्वभौमत्वाशी थेट जोडलेले असते. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा तेल ग्राहक देश असून, आपल्या गरजेच्या ८५ टक्क्यांपेक्षा जास्त कच्चे तेल आपण आयात करतो. यामुळेच जागतिक भू-राजकारणातील घडामोडींचा आणि दबावाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होतो. परंतु, अलीकडच्या काळात भारताने जागतिक दबावाला बळी न पडता आपल्या 'राष्ट्र प्रथम' या धोरणाचा अवलंब करून जगाला चोख प्रत्युत्तर दिले आहे.

जागतिक राजकारणाच्या पटावर एक अत्यंत अभूतपूर्व आणि ऐतिहासिक घडामोड आकाराला येत आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या गुंतागुंतीच्या जाळ्यात, ऊर्जा सुरक्षा आणि राष्ट्रीय हिताची सांगड घालणे हे कोणत्याही विकसनशील देशासमोरील सर्वांत मोठे आव्हान असते. एकीकडे अमेरिकेसारख्या महासत्तांचे आर्थिक दबावतंत्र आणि दुसरीकडे देशांतर्गत अर्थव्यवस्थेची व सामान्य जनतेची गरज, अशा दुहेरी कात्रीत सापडलेल्या भारताने गेल्या काही वर्षांत आपले परराष्ट्र धोरण अत्यंत कौशल्याने आणि स्वाभिमानाने राबवले आहे. विशेषतः रशिया आणि युक्रेन संघर्षानंतर निर्माण झालेल्या जागतिक अस्थिरतेच्या काळात भारताने दाखवलेली प्रगल्भ राजकीय इच्छाशक्ती वाखाणण्याजोगी आहे. अमेरिकेच्या निर्बंधांच्या आणि १०० टक्के आयात शुल्काच्या धमक्यांना न जुमानता भारताने घेतलेली ठाम भूमिका ही केवळ एका तात्पुरत्या आर्थिक लाभाची तडजोड नसून, ती एका उदयोन्मुख महासत्तेची स्वयंपूर्ण आणि स्वतंत्र वैचारिक जडणघडण दर्शवते.

अमेरिकेने रशियाच्या ऊर्जा क्षेत्रावर कठोर निर्बंध लादण्यासाठी आणि रशियाला आर्थिक पातळीवर कोंडीत पकडण्यासाठी रशियन तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लागू करण्याचे अत्यंत आक्रमक विधेयक आणले आहे. अमेरिकन संसदेने जवळपास ४ दशकांनंतर आपल्या कार्यकारी मंडळाला एवढे मोठे आणि अमर्याद विशेषाधिकार बहाल केले आहेत. या नव्या कायद्यात भारत आणि चीनसारख्या देशांचे थेट नाव घेण्यात आले आहे, जेणेकरून त्यांच्या द्विपक्षीय व्यापारावर थेट परिणाम घडवून त्यांना रशियाविरोधी गटात ओढता येईल. परंतु, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने अत्यंत स्पष्ट, रोखठोक आणि खणखणीत शब्दांत ही अमेरिकन भूमिका फेटाळून लावली आहे. १४० कोटी भारतीयांची ऊर्जा सुरक्षा अबाधित ठेवणे आणि त्यांना परवडणाऱ्या दरात इंधन उपलब्ध करून देणे, हेच भारत सरकारचे सर्वोच्च राष्ट्रीय कर्तव्य असल्याचे भारताने जगाला ठणकावून सांगितले आहे. हा निर्णय घेण्यामागे केवळ राजकीय धाडस नसून, देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या दूरगामी परिणामांचा अत्यंत सखोल आणि तर्कशुद्ध विचार दडलेला आहे.

या धाडसी निर्णयाचे आर्थिक गणित समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर १०० ते १२० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले होते. अशा अत्यंत स्फोटक आणि अस्थिर परिस्थितीत रशियाने भारताला प्रति बॅरल सुमारे २० ते ३० डॉलर सवलतीत तेल उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव ठेवला. भारताने आंतरराष्ट्रीय दबावाला भीक न घालता हा प्रस्ताव स्वीकारला. या एका ऐतिहासिक व्यापारी करारामुळे भारताने अब्जावधी रुपयांच्या मौल्यवान विदेशी चलनाची बचत केली आहे. जर भारताने आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढीव दराने तेल खरेदी केले असते, तर देशात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती गगनाला भिडल्या असत्या. इंधनाचे दर वाढल्याने वाहतूक खर्चात प्रचंड वाढ होऊन सर्वसामान्यांसाठी अन्नधान्यापासून ते जीवनावश्यक वस्तूंपर्यंत सर्वच गोष्टी असह्यपणे महाग झाल्या असत्या. थोडक्यात सांगायचे तर, रशियन तेलाच्या या सवलतीमुळे देशातील महागाई नियंत्रणात राहिली, रुपयाचे अवमूल्यन टळले आणि भारतीय अर्थव्यवस्थेला एक भक्कम आधार मिळाला.

याखेरीज, भारताच्या या धोरणाचा एक अत्यंत मोठा आणि धोरणात्मक फायदा देशातील रिफायनरी क्षेत्राला झाला. भारतीय सरकारी कंपन्यांबरोबरच अनेक मोठ्या खासगी कंपन्यांनी हे स्वस्त रशियन कच्चे तेल मोठ्या प्रमाणावर आयात केले. त्यावर देशांतर्गत रिफायनरीजमध्ये प्रक्रिया करून त्यातून पेट्रोल, डिझेल आणि विमानांचे इंधन तयार केले. विशेष म्हणजे, हेच प्रक्रिया केलेले इंधन भारताने युरोप आणि अमेरिकेसह अनेक पाश्चात्य देशांना आंतरराष्ट्रीय बाजारभावाने निर्यात केले. ज्या पाश्चात्य देशांनी रशियावर निर्बंध लादले होते, तेच देश आज भारताकडून रशियन तेलावर आधारित इंधन विकत घेत आहेत, हा या जागतिक राजकारणातील सर्वात मोठा विरोधाभास आहे. यामुळे भारताची पेट्रोलियम पदार्थांची निर्यात अनेक पटींनी वाढली आणि परकीय चलनाचा ओघ वाढून अर्थव्यवस्थेला अभूतपूर्व बळकटी मिळाली.

ऊर्जा पुरवठ्यातील या विविधीकरणामुळे भारताची आखाती देशांवरील ऐतिहासिक अवलंबित्व लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. पूर्वी भारताला इराक, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती यांसारख्या देशांवर बहुतांश इंधनासाठी अवलंबून राहावे लागत असे. रशियन तेलाच्या आगमनाने भारताला एक नवा, मोठा आणि अत्यंत खात्रीशीर पुरवठादार मिळाला आहे. यामुळे जागतिक पुरवठा साखळीत अचानक निर्माण होणाऱ्या संकटांपासून किंवा आखाती देशांमधील राजकीय अस्थिरतेपासून देशाचे मोठ्या प्रमाणावर रक्षण झाले आहे.

सर्वांत महत्त्वाचा आणि जागतिक पटलावरील कळीचा मुद्दा म्हणजे, जर भारताने पाश्चिमात्य देशांच्या दबावाला बळी पडून रशियाचे तेल नाकारले असते आणि आपली संपूर्ण मागणी पुन्हा आखाती देशांकडे वळवली असती, तर जागतिक बाजारात तेलाचा प्रचंड मोठा तुटवडा निर्माण झाला असता. मागणी वाढल्याने आणि पुरवठा मर्यादित राहिल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे भाव १५० डॉलरच्याही पुढे गेले असते. अशा प्रकारे, भारताने रशियाकडून तेल खरेदी करून केवळ स्वतःच्याच नव्हे, तर अप्रत्यक्षरीत्या संपूर्ण जागतिक बाजारातील महागाईलाही आळा घातला आहे. भारताच्या या एका निर्णयाने जागतिक अर्थव्यवस्थेला एका मोठ्या मंदीतून वाचवले आहे, हे नाकारता येणार नाही.

अमेरिकेच्या आयात शुल्काच्या धमक्यांना न घाबरता भारताने घेतलेली ही भूमिका म्हणजे स्वतंत्र आणि सार्वभौम भारताच्या प्रगल्भ कूटनीतीचे सर्वोत्तम उदाहरण आहे. राष्ट्रीय हिताशी कोणतीही तडजोड न करता, ऊर्जा सुरक्षा आणि देशांतर्गत आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी जागतिक महासत्तांशी थेट समोरासमोर उभे राहण्याचे हे भारताचे पाऊल, नव्या जागतिक व्यवस्थेतील भारताच्या वाढत्या आणि निर्णायक प्रभावाची साक्ष देते.

- ९५६१५९४३०६

# रुग्णालयातील आगीच्या घटना चिंताजनक

लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)

मुलगा झाला ही आनंदाची वार्ता सर्व नातेवाईकांना फोनवरून सांगणाऱ्या स्वप्नील बर्गे या पित्याचा आणि त्या निष्पाप किंतू अगदीच अल्पायुषी ठरलेल्या मुलाला जन्म देणाऱ्या मातेचा आनंद क्षणातच शोक सागरात बुडावा अशी दुदैवी घटना २४ ऑगस्टच्या पहाटे अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात घडली.

२४ ऑगस्ट २०२६ च्या पहाटे अगदी तीन ते साडे तीनच्या दरम्यान डफरिन रुग्णालयातील नवजात शिशू कक्षाच्या आऊटबॉर्न विभागात अचानक आग लागली. एका माहितीनुसार त्यावेळी तिथे तब्बल ३९ नवजात बालके भरती होती. आऊटबॉर्न युनिटमधील व्हेंटिलेटरमध्ये अचानक स्फोट होऊन आग लागली. मात्र, या दुर्घटनेत कर्तव्यावर हजर असलेल्या ललिता कासदेकर या परिचारिकेसह इतरांनी जीवाची बाजी लावत त्यातील ३६ नवजात बाळांना मृत्यूच्या दाढेतून खेचून बाहेर काढले. मात्र, दुर्दैव असे की झालेला काळोख आणि गुदमरून टाकणारा धूर यामुळे तीन बालकांना कुणीच वाचवू शकले नाही. रुग्णालयाचा सर्व परिसर किंकाळ्यानी भरून निघावा अशी ती काळरात्र विसरणे कठीणच. याहून कठीण मृत झालेल्या बालकांच्या पालकांचा टाहो.



या प्रकरणाची चौकशीअंती, रुग्णालयातील देखभालीची जबाबदारी असलेल्या 'मेसर्स एओव्ही इंटरनॅशनल एलएलपी' या कंपनीच्या कामात दोष आणि हलगर्जीपणा आढळून आल्याचे म्हटले आहे. तसेच वैद्यकीय उपकरणे पुरविणाऱ्या शिलर कंपनीच्या सेवांमध्येही दोष आढळून आले आहेत. यातील दोषींना काळ्या यादीत टाकण्याचे प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत. तसेच या प्रकरणी रुग्णालयाचे आरोग्य उपसंचालक, सीएससह इतर पाच जणांना निलंबित करण्यात आल्याचे वृत्त होते.

तीन मुलांच्या होरपळून मृत्यू प्रकरणी कारवाई होणार यात दुमत नाही. मात्र, अशा घटना देशात वारंवार घडत असल्याने यावर गांभीर्याने विचार करणे आणि रुग्णालयांचे वारंवार योग्य प्रकारे फायर ऑडिट होणे गरजेचे आहे. रुग्णालयात घडणाऱ्या अशा आगीच्या घटना खरेच चिंताजनक आहेत.

मागे ९ जानेवारी २०२१ रोजी भंडारा येथील एका रुग्णालयात लागलेल्या आगीत अशीच दहा निष्पाप जीव होरपळले होते. त्याची शाई वाळत नाही तर, अमरावतीची ही घटना जीव हेलावून सोडणारी आहे. ज्या बालकांनी या सृष्टीचा आनंद घेण्यासाठी नुकतेच पाऊल टाकावे आणि काळाने असा घाला घालावा हे शल्य हृदयाला बोचणारे आहे. विशेष म्हणजे अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या जुन्या इमारतीत सुद्धा तीन वर्षांपूर्वी नवजात शिशू अतिदक्षता विभागात लागलेल्या भीषण आगीत एका बालकाचा होरपळून मृत्यू झाला होता. तरी या घटनेनंतर रुग्णालय प्रशासनाला जाग न यावी म्हणजे नवलच.

देशात अन्य एका घटनेत तामिळनाडू येथील रामनाथपुरम जिल्ह्यातील ऐरवडी येथील एका अनधिकृत मनोरुग्णालयात ६ ऑगस्ट २००१ रोजी लागलेल्या भीषण आगीत सुद्धा २८ जण जिवंत जळाले होते. देशात २००१ ते २०२६ या कालावधीत कोलकाता, भुवनेश्वर, मुर्शिदाबाद, मुंबई, भरूच, अहिल्यानगर, नवी दिल्ली, झाशी, जयपूर, छिंदवाडा अशा कित्येक शहरांतील रुग्णालयात आगीच्या लहान मोठ्या दुर्घटना घडून कितीतरी जीवांचा कोळसा झाला आहे. कितीतरी निष्पाप जीव उमलण्या आधीच भरडले गेले आहेत. त्यात कित्येक नवजात बालिकांचा सुद्धा समावेश आहे.

छत्रपती संभाजी नगर मधील एका रुग्णालयात सप्टेंबर २०२६ मध्ये पहाटे आग लागली. त्या वेळी ५८ रुग्ण आणि ९ लहान बाळे उपचारासाठी दाखल होती. सुदैवाने, सर्वांना तातडीने सुरक्षित बाहेर काढण्यात आल्याने मोठी जीवितहानी टळली होती. मात्र, प्रत्येक बालकांचे असे सुदैव नव्हते.

देशात आरोग्य मंदिर असलेल्या रुग्णालयांत अशा आगीच्या वारंवार घटना घडत असतील तर यावर प्रशासनाने कंबर कसून योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे. तेथील उपकरणांची गुणवत्ता तपासणे, फायर ऑडिट करणे तसेच अशा घटना प्रसंगी बाहेर पडायचे मार्ग या सर्व गोष्टींची तपासणी आणि त्यावर अंमलबजावणी गरजेची आहे.

- ८४१२८७७२२०

# विंडीज विरुद्ध पहिल्या टी-२० तील विजयाचे श्रेय श्रेयस अय्यरला!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारताने मंगळवारी वेस्ट इंडिजला आठ गडी राखून पराभूत करून आपला सलग १०वा टी-२० आंतरराष्ट्रीय विजय नोंदवला. कर्णधार श्रेयस अय्यरने आपले पहिले टी-२० आंतरराष्ट्रीय शतक झळकावले, तर पदार्पण करणाऱ्या अष्टपैलू नमन धीरने तीन बळी घेऊन भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. प्रथम गोलंदाजी करताना भारताने वेस्ट इंडिजला १७१ धावांवर रोखले आणि त्यानंतर अय्यर (१०२ नाबाद) आणि इशान किशन (३७ नाबाद) यांच्यातील १३७ धावांच्या भागीदारीमुळे १४.४ षटकांतच लक्ष्य गाठले.

### नमन धीरचे प्रभावी पदार्पण

नमन धीरने भारतासाठी शानदार गोलंदाजी करत ३१ धावांत तीन बळी घेतले. कुलदीप यादवनेही दोन बळी घेतले. अक्षर पटेल आणि अर्शदीप सिंग यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. मात्र, वेस्ट इंडिजने वेगवान सुरुवात केली. कर्णधार शाई होपने दुसऱ्या षटकात मयंक यादवच्या गोलंदाजीवर सलग चार चौकार मारले. त्यानंतर कर्णधार श्रेयस अय्यरने तिसऱ्या षटकात मयंकच्या जागी अक्षर पटेलला गोलंदाजीसाठी आणले.

नमन धीरने एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यानंतर अवघ्या १० दिवसांत टी-२० आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. त्याने ४ षटकांत ३१ धावा देऊन तीन बळी घेतले. त्या एकदिवसीय मालिकेत त्याने गोलंदाजी केली असती. ५२ धावांवर तो पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याच्यासोबत धोकादायक रोमॅरिओ शेफर्ड आणि शमर स्प्रिंगरही होते.

पदार्पण टी-२० आंतरराष्ट्रीयः तीन बळी, त्याने प्रज्ञान ओझा आणि अक्षर पटेल यांच्या क्लबमध्ये प्रवेश केला आहे. तो भारतासाठी पदार्पणात सर्वोत्तम कामगिरी करणारा तिसरा फिरकी गोलंदाज ठरला आहे. एकूणच, बरिंदर सरन पहिल्या क्रमांकावर आहे. २०१६ मध्ये, त्याने झिम्बाब्वेविरुद्ध ४ षटकांत १० धावा देऊन ४ बळी घेतले होते. तर या यादीत प्रज्ञान ओझा दुसऱ्या क्रमांकावर आहे.

### टी२० आंतरराष्ट्रीय पदार्पणातील सर्वोत्तम गोलंदाजी आकडेवारी (भारतीय फिरकी गोलंदाज)

४/२१ः प्रज्ञान ओझा विरुद्ध बांगलादेश, ट्रेंट ब्रिज, २००९
३/१७ः अक्षर पटेल विरुद्ध झिम्बाब्वे, हरारे, २०१५
३/३१ः नमन धीर विरुद्ध वेस्ट इंडिज, लखनौ, २०२६

अर्शदीप सिंगने कामिल पूरनला त्रिफळाचित करून भारताला पहिले यश मिळवून दिले. सहाव्या षटकात शिमरॉन हेटमायर धावबाद झाला, तर त्याच षटकात अक्षर पटेलने रोव्हमन पॉवेलला बाद करून वेस्ट इंडिजला दुहेरी धक्का दिला.

### होप आणि रदरफोर्डने डाव सावरला

एका क्षणी, वेस्ट इंडिजची अवस्था ११४ धावांवर पाच गडी अशी बिकट झाली होती. त्यानंतर शेर्फेन रदरफोर्डने सूत्रे हाती घेतली आणि ३४ चेंडूंमध्ये आक्रमक ५६ धावा केल्या. रदरफोर्डने कुलदीपच्या षटकात दोन षटकार आणि अक्षरच्या गोलंदाजीवर दोन चौकार व एक षटकार मारला. शाई होपनेही ३७ चेंडूंमध्ये ५२ धावा केल्या. तथापि, १२ व्या षटकात नमन धीरने त्याला बाद केल्यावर भारताला मोठे यश मिळाले. त्यानंतर कुलदीपने रॉस्टन चेसला पायचीत केले.

रोमॅरिओ शेफर्डने धीरच्या गोलंदाजीवर एक षटकार मारला, पण पुढच्याच चेंडूवर तो लाँग ऑफला झेलबाद झाला. कुलदीपने रदरफोर्डलाही बाद केले. त्यानंतर धीरने शमर स्प्रिंगरला बाद करून आपली तिसरी विकेट घेतली. अक्षर पटेलने अखिल होसेनला शेवटची विकेट म्हणून बाद केले आणि वेस्ट इंडिजचा डाव १७१ धावांवर संपुष्टात आला.

### भारताची खराब सुरुवात

१७२ धावांचे लक्ष्य गाठताना भारताची सुरुवात खराब झाली. संघाने पहिल्या चार षटकांतच अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांच्या विकेट्स गमावल्या. २१ धावा करणाऱ्या अभिषेकला रॉस्टन चेसने बाद केले, तर शिमरॉन हेटमायरने एक अप्रतिम झेल घेतला. पुढच्याच षटकात, संजू सॅमसन ११ धावांवर अकील होसेनच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांनी डाव सावरला. भारताने मंगळवारी वेस्ट इंडिजला आठ सामन्यांच्या मालिकेत पराभूत करून आपला सलग १० वा टी-२० आंतरराष्ट्रीय विजय नोंदवला. कर्णधार श्रेयस अय्यरने आपले पहिले टी-२० आंतरराष्ट्रीय शतक झळकावले, तर पदार्पण करणाऱ्या अष्टपैलू नमन धीरने तीन बळी घेत भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

### श्रेयसचा धावांचा पाठलाग करताना शतकांचा दुष्काळ संपला

श्रेयस अय्यरने दुसऱ्या डावात नाबाद १०२ धावा केल्या आणि धावांचा पाठलाग करताना शतक झळकावणारा तो चौथा भारतीय खेळाडू ठरला. धावांचा पाठलाग करताना सर्वाधिक शतके करण्याचा विक्रम केएल राहुलच्या नावावर आहे, त्याने दोन शतके केली आहेत. धावांचा पाठलाग करताना एखाद्या भारतीय फलंदाजाने शतक झळकावून आता चार वर्षे झाली आहेत. यापूर्वीचे शतक २०२२ मध्ये सूर्यकुमार यादवने इंग्लंडविरुद्ध केले होते.

### अक्षर पटेलने चौथ्यांदा पॉवरप्लेमध्ये निर्धाव षटक टाकले

अक्षर पटेलने लखनौमध्ये सहाव्या षटकात एकही धाव न देता रोव्हमन पॉवेलची विकेट घेतली. हा त्याचा चौथा टी२० आंतरराष्ट्रीय सामना होता. टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक निर्धाव षटके टाकण्याचा भारतीय विक्रम भुवनेश्वर कुमारच्या नावावर आहे. त्याने हा पराक्रम सहा वेळा केला आहे.

### हेटमायर विचित्र पद्धतीने धावबाद

पहिल्या डावाच्या सहाव्या षटकात, वेस्ट इंडिजचा एक फलंदाज विचित्र पद्धतीने धावबाद झाला. चेंडू अक्षरच्या हाताला लागून कव्हरच्या दिशेने गेला. तिथे क्षेत्ररक्षण करणाऱ्या श्रेयस अय्यरने चेंडू पकडला आणि यष्टीरक्षक संजू सॅमसनकडे फेकला. सॅमसनने तात्काळ यष्टी उध्वस्त केल्या. रिप्लेमध्ये दिसले की, जेव्हा हेटमायरने क्रीजवर पोहोचण्यासाठी झेप घेतली, तेव्हा त्याची बॅट आणि हँडल हवेत होते. त्यानंतर तिसऱ्या पंचांनी त्याला धावबाद घोषित केले. मात्र, हेटमायर या निर्णयावर नाराज दिसला. पंचांनी मान्य केले की, जेव्हा सॅमसनने यष्टी उध्वस्त केल्या, तेव्हा हेटमायरची बॅट क्रीजच्या आत जमिनीला स्पर्श करत नव्हती.

भारतीय डावाच्या ११ व्या षटकात, तिसरे पंच रोहन पंडित यांनी एक वादग्रस्त निर्णय दिला. यामुळे वेस्ट इंडिजचे खेळाडू आणि प्रशिक्षक डॅरेन सॅमी दोघेही संतापले.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# भारतीय परंपरेतील जीवन घडवून कठोर परिश्रम घेणे काळाची गरज : डॉ. मोहन भागवत

## देवलापार 'गोतीर्थ' म्हणून देशात नावारूपाला येईल : राज्यमंत्री आशिष जयस्वाल, देवलापार येथील गो-अनुसंधान केंद्रात विविध विकासकामांचा शुभारंभ;



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

विश्व हिंदू परिषदचे प्रमुख अशोक सिंघल यांच्या जन्मसताब्दी निमित्त देवलापार येथील गो-अनुसंधान केंद्राच्या विविध विकासकामांचा शुभारंभ सरसंघचालक पूजनीय मोहनजी भागवत यांच्या शुभहस्ते आज बुधवार दिनांक ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी संपन्न झाला.

सरसंघचालक मोहन भागवत या कार्यक्रम प्रसंगी म्हणाले, "शब्द हवेत विरून जातात, पण केलेले कार्य अमर होते. आपल्या स्वतःच्या जीवनाच्या सुरक्षिततेसाठी, आपल्या दोघांच्याही सुरक्षिततेसाठी, आपल्या धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी, आणि जगाच्या कल्याणासाठी, जो मार्ग अधिकाधिक आवश्यक होत आहे तो हा की, भारतातील लोकांनी भारताच्या परंपरांनुसार आपले जीवन घडवून कठोर परिश्रम घ्यावेत.

याप्रसंगी बोलतांना राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले, "रामटेक ही प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. ही महाकवी कालिदासांची भूमी आहे. आणि याच पवित्र भूमीतून 'ग्रामोदय ते राष्ट्रोदय' चा विचार देशासमोर मांडणारे सरसंघचालक पूजनीय मोहनजी भागवत आज येथे उपस्थित आहेत, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांचे मी मनःपूर्वक स्वागत करतो.

गेल्या दोन-तीन वर्षांपासून देवलापार येथील या गो-अनुसंधान केंद्राचा विकास माझ्या डोळ्यांसमोर होताना मी पाहत आहे. या प्रवासातील अनेक टप्प्यांचा मी साक्षीदार राहिलो आहे. आज या व्यासपीठावर उपस्थित असलेले सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी आणि या संपूर्ण प्रकल्पासाठी योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे योगदान अत्यंत मोठे आहे. या सर्वांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांचे आभार मानतो.

देवलापारची ओळख आजवर वन्यजीव आणि विशेषतः वाघांसाठी प्रसिद्ध असलेल्या भूमी म्हणून राहिली आहे. मात्र, मला विश्वास आहे की येणाऱ्या काळात देवलापारची ओळख गोमातेच्या सेवेसाठी, गो-अनुसंधान केंद्रासाठी आणि गोतीर्थ म्हणूनही संपूर्ण देशात निर्माण होईल. एका बाजूला प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झालेले रामटेकचे गडमंदिर आणि दुसऱ्या बाजूला गोमातेच्या सेवेला समर्पित होत असलेले हे गो-अनुसंधान केंद्र या दोन्हींच्या माध्यमातून रामटेकची आध्यात्मिक आणि सांस्कृतिक ओळख अधिक भक्कम होणार आहे.

गेल्या वर्षी या परिसराला गोतीर्थ आणि गो-पर्यटनाचा दर्जा मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न केले. गोसेवा आयोगाच्या माध्यमातूनही या केंद्राला आवश्यक मान्यता मिळाली. यासाठी गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो. महाराष्ट्र शासनाने या परिसराला पर्यटन आणि तीर्थक्षेत्र म्हणून मान्यता दिल्यामुळे या विकासाला निश्चितच नवी दिशा मिळाली आहे. या केंद्राच्या उभारणीसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित असंख्य कार्यकर्त्यांनी, स्वयंसेवकांनी आणि समाजातील अनेक व्यक्तींनी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच आज आपण या प्रकल्पाचे हे भव्य स्वरूप पाहत आहोत. या सर्वांचेही मी मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार मानतो.

आज गोमातेच्या संवर्धनासाठी आणि आपल्या धर्म-संस्कृतीच्या जतनासाठी काम करणारे सरकार राज्यात आहे. पूर्वी अशा उपक्रमांना शासनाकडून आवश्यक ते पाठबळ मिळत नसे. मात्र, आज गोमाता, गोसंवर्धन, भारतीय संस्कृती आणि धार्मिक-सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी सकारात्मक भूमिका घेणारे सरकार आहे. त्यामुळे या कार्याला निश्चित शासनाचे सहकार्य मिळेल आणि आपण हे काम अधिक मोठ्या प्रमाणावर पुढे नेऊ. देवलापार हे भविष्यात गोमातेच्या सेवेसाठी आणि गो-अनुसंधानासाठी देशाच्या नकाशावर एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी महाराष्ट्राचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल,विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष आलोक कुमार, राज्यसभा खासदार माया ताई इवनाते,विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय गोरक्षा प्रमुख दिनेश तादे, महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, कार्यकारिणी मंडळाचे अध्यक्ष पदोश गुप्ता,कार्याध्यक्ष डॉ. हेमंत जांभेकर,उपाध्यक्ष यशपाल आर्य,उपाध्यक्ष सुधीर द्विवेदी, सचिव सनत कुमार गुप्ता यांच्यासह गोसेवा आयोगाचे पदाधिकारी, विश्व हिंदू परिषदेचे पदाधिकारी, विविध क्षेत्रांतील मान्यवर, गोभक्त नागरिक आणि मोठ्या संख्येने गोभक्त बंधू-भगिनी उपस्थित होते.

### थोडक्यात

## कळमना जंगलात विजेचा सापळा लावून रानडुकराची शिकार: मध्य प्रदेशातील चार संशयित ताब्यात



दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर :-(धनंजय पांढरे )

बल्लारशाह वनपरिक्षेत्रातील कळमना उपक्षेत्राच्या संरक्षित वनखंड क्रमांक ५७२ मधील ११ केव्ही उच्चदाब विद्युत वाहिनीचा वापर करून रानडुकराची शिकार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जिवंत वीजप्रवाह सोडून तयार करण्यात आलेल्या सापळ्यात अडकून रानडुकराचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी वनविभागाने मध्य प्रदेशातील चार संशयितांना ताब्यात घेतले असून, त्यांची चौकशी सुरू आहे. ५ ऑक्टोबरच्या रात्री शिकारीसाठी ११ केव्ही विद्युत वाहिनीवरून जिवंत वीजप्रवाह घेण्यात आला. बांबूच्या खुट्यांच्या साहाय्याने विद्युत तार वनक्षेत्रात टाकून शिकारीचा सापळा तयार करण्यात आला होता. या सापळ्याच्या संपर्कात आल्याने रानडुकराला विजेचा जोरदार धक्का बसला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. मंगळवारी सकाळी हा प्रकार वनविभागाच्या निदर्शनास आला.

घटनेची माहिती मिळताच वनकर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. त्यानंतर या प्रकरणात वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ मधील तपासादरम्यान रामभरोसे इंदलसिंग उईके, मिलाप मंगल भलावी, अनिल पुलसिंग मरकाम आणि नागेश बुद्धराम उईके, सर्व रा. उमरीया, ता. लामटा, जि. बालाघाट, मध्य प्रदेश या चार संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. हे चारही संशयित सध्या कळमना येथील बालाजी बांबू सप्लायर डेपो येथे वास्तव्यास असल्याची माहिती वनविभागाने दिली आहे. वन्यप्राण्यांच्या शिकारीसाठी थेट उच्चदाब विद्युत वाहिनीचा वापर करण्यात आल्याने या घटनेची गंभीर दखल वनविभागाने घेतली आहे. या शिकारीमागे आणखी व्यक्तींचा सहभाग आहे का, तसेच परिसरात अशाच पद्धतीने वन्यप्राण्यांची शिकार केली जात होती का, याचा तपास करण्यात येत आहे. त्यामुळे चौकशीत शिकारीचे मोठे जाळे उघडकीस येण्याची शक्यता आहे. सदर कारवाई वनपरिक्षेत्राधिकारी राजेंद्र घोरुडे, क्षेत्रसहायक देवराव टेकाम, वनपाल डी. आर. चागलवार, वनरक्षक सुधीर बोकडे, अतुल मोहले, वैशाली जेणेकर, सविता गेडाम यांच्यासह वनकर्मचाऱ्यांनी केली.

## चिखली (मैना) येथील प्रकार; पार्सलवर विक्रेत्या कंपनीचा पूर्ण पत्ता नसल्याने ग्राहकांमध्ये संताप

दै. सिंहवाणी वृत्त, काटोल

ग्रामीण भागातील नागरिकांकडून ऑनलाइन खरेदी वाढत असताना ऑनलाइन पार्सलच्या माध्यमातून ग्राहकांची फसवणूक होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. काटोल तालुक्यातील चिखली (मैना) येथे अशाच प्रकाराचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. चिखली (मैना) येथील अशोक प्रल्हाद दुपारे यांनी



ऑनलाइन माध्यमातून प्रोजेक्टरची ऑर्डर केली होती. ऑर्डरसाठी ऑनलाइन पेमेंट करण्यात आले. मात्र, पार्सल घरी आल्यानंतर ते उघडले असता त्यामध्ये प्रोजेक्टरऐवजी माती असल्याचे आढळून आले, असा आरोप दुपारे यांनी केला आहे.

विशेष म्हणजे, संबंधित पार्सलवर ज्या कंपनीने किंवा विक्रेत्याने वस्तू पाठवली आहे, त्याचे नाव व पूर्ण पत्ता स्पष्टपणे उपलब्ध नसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित विक्रेत्याची ओळख पटवणे आणि फसवणूक झाल्यास त्याच्याविरुद्ध कारवाई करणे ग्राहकांसाठी कठीण ठरत असल्याचे दुपारे यांनी सांगितले.

ऑनलाइन खरेदीसाठी ग्राहकाने अमेझॉनच्या माध्यमातून व्यवहार केला असल्याने, ग्राहकांच्या सुरक्षिततेची आणि विक्रेत्यांची योग्य माहिती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कोणाची ?, असा प्रश्न या घटनेमुळे उपस्थित झाला आहे. अशा प्रकारच्या प्रकरणात ऑनलाइन प्लॅटफॉर्म, संबंधित विक्रेता किंवा डिलिव्हरी प्रक्रियेत सहभागी घटक यापैकी नेमकी जबाबदारी कोणाची आहे, याची चौकशी होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील अनेक ग्राहक ऑनलाइन खरेदीवर विश्वास ठेवून वस्तू मागवतात. मात्र, वस्तूऐवजी वेगळे साहित्य मिळणे, विक्रेत्याचा पत्ता उपलब्ध नसणे किंवा तक्रारीनंतर योग्य प्रतिसाद न मिळणे, यामुळे ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ शकते. या प्रकरणाची संबंधित यंत्रणांनी चौकशी करून ग्राहकाला त्याची रक्कम परत मिळवून द्यावी तसेच ऑनलाइन खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या हितासाठी विक्रेत्याची ओळख, पत्ता आणि व्यवहाराची माहिती स्पष्टपणे उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी चिखली (मैना) येथील ग्रामस्थांनी केली आहे.

## माजी ग्रामपंचायत सदस्य मदनसिंह भैय्यालाल सिंह ठाकुर यांचे दीर्घ आजाराने निधन

दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी

महादुला श्रीवासनगर येथील रहिवासी आणि महादुला जुन्या



ग्रामपंचायत मधील माजी ग्रामपंचायत सदस्य राहिलेले, सर्वांशी प्रेमळ संबंध असणारे कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती तसेच परमात्मा सेवक मंडळाचे ते जेष्ठ मार्गदर्शक ही होते. ६८वर्षीय मदनसिंह यांचे मेरे दोन मुले एक मुलगी आणि पत्नी असा परिवार आहे त्याचा एक मुलगा गोपालसिंग नईकाने हा नगरपंचायत महादुला येथे नगरसेवक आहे. त्यांच्यावर दिनाक ८ ऑक्टोबर गुरुवारी सकाळी ११.३० वाजता कोल्हार नदी स्मशानघाट येथे अंतिम संस्कार होणार आहे.

## काचूरवाही येथे वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, काचूरवाही

सामाजिक वनीकरण विभाग, रामटेक अंतर्गत स्व.ॲड नंदकिशोर जयस्वाल माध्यमिक विद्यालय, काचूरवाही येथे वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला वनपाल कांचन श्रीरंग वनरक्षक श्री. हांडे वनरक्षक आजमी सर तसेच भोयर उपस्थित होते. यावेळी उपस्थित वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना वन्यजीवांचे संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

वन्यजीव सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव व पर्यावरणाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी चित्रकला स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांना व विचारांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. या कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वन्यजीवांचे संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी असून पर्यावरण संतुलनासाठी वन्यजीवांचे संवर्धन आवश्यक असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# हुंदाई वर्कशॉपमध्ये विजेचा कहर : २१ वर्षीय कामगाराचा दुर्दैवी मृत्यू

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे

कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी सकाळी कामावर गेलेल्या २१ वर्षीय तरुणाचा विजेच्या धक्क्याने दुर्दैवी अंत झाल्याने मोरवा परिसरावर शोककळा पसरली. नागपूर मार्गावरील ताडाळीजवळील केतन हुंदाई वर्कशॉपमध्ये मंगळवारी सकाळी सुमारे ११ वाजता ही हृदयद्रावक घटना घडली. सारंग उर्फ मोहन कोयताडे २१ वर्षे रा. मोरवा, असे मृत कामगाराचे नाव आहे. सहकारी शुभम उमाटे २९ वर्षे यालाही मोहनला वाचविताना विजेचा धक्का बसला.

नेहमीप्रमाणे मोहन आणि शुभम डेंटिंग-पेंटिंगच्या कामासाठी वर्कशॉपमध्ये आले होते. परिसरात अचानक दुर्गंधी येत असल्याने नेमके कारण जाणून घेण्यासाठी त्यांनी टिनाच्या शेडवर चढून पाहणी सुरू



केली.

याचवेळी वर्कशॉपलगतच्या झाडाला लागून गेलेल्या जिवंत विद्युत तारेतून संपूर्ण झाडात वीजप्रवाह उतरल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही. पाहणी करत असतानाच मोहनचा झाडाला स्पर्श झाला आणि क्षणार्धात विजेचा जबर धक्का बसला.

डोळ्यांसमोर सहकारी विजेच्या विळख्यात सापडल्याचे पाहून शुभमने त्याला वाचविण्यासाठी धाव घेतली. मात्र मदतीसाठी पुढे सरसावलेल्या शुभमलाही विजेचा धक्का बसला. त्यानंतर इतर कामगारांनी धाव घेत दोघांना बाहेर काढले. गंभीर अवस्थेतील मोहनला तातडीने पडोली येथे आणि त्यानंतर चंद्रपूर येथील बालाजी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. शुभमवर उपचार करण्यात आल्यानंतर त्याला रुग्णालयातून सुटी देण्यात आली.

मोहनच्या मृत्यूची बातमी समजताच वर्कशॉपमधील कामगारांना मोठा धक्का बसला. काही वेळातच संतप्त कामगारांनी वर्कशॉप बंद ठेवून बालाजी रुग्णालय गाठले. तरुण मुलगा गमावलेल्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई मिळेपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका कामगारांनी घेतली. ३० लाख रुपयांच्या नुकसानभरपाईची मागणी करण्यात आल्याने रुग्णालय परिसरात तणाव निर्माण झाला.

व्यवस्थापनाकडून सुरुवातीला १० लाख रुपयांची मदत देण्याची तयारी दर्शविण्यात आली. मात्र कामगार आपल्या मागण्यांवर ठाम राहिले. परिस्थिती चिघळू नये म्हणून रामनगर पोलिसांचे पथक आणि दंगा नियंत्रण पथक रुग्णालयात दाखल झाले. व्यवस्थापन, कामगार आणि पोलिसांमध्ये रात्री उशिरापर्यंत चर्चेच्या फेऱ्या सुरू होत्या.

अखेर मृताच्या कुटुंबीयांना १४ लाख रुपयांची मदत, इतर लाभ तसेच मोहनच्या वडिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर रात्री उशिरा मृतदेह ताब्यात घेण्यात आला. रोजीरोटीसाठी घराबाहेर पडलेल्या तरुणाचा अशा पद्धतीने दुर्दैवी अंत झाल्याने मोरवा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी काटोलमध्ये राष्ट्रवादीचा मोर्चा

## निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा; राष्ट्रपतींना निवेदन, शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख मदतीची

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

स्वायत्त घटनात्मक संस्थांची स्वायत्तता धोक्यात आल्याचा आरोप तसेच निवडणूक प्रक्रियेतील निष्पक्षतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे सांगत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तातडीने आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)च्या वतीने काटोल येथे जोरदार मोर्चा काढण्यात आला. माजी गृहमंत्री अनिल देशमुख व जिल्हाध्यक्ष सलील देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चात मोठ्या संख्येने नागरिक व कार्यकर्ते सहभागी झाले होते.



मोर्चानंतर उपविभागीय अधिकारी, काटोल यांच्यामार्फत महामहीम राष्ट्रपती भारत सरकार यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

निवेदनात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. निवडणूक आयोगासारख्या सर्वोच्च घटनात्मक संस्थेमध्ये सहआयुक्तांचे मत आणि कायदेशीर आक्षेप बाजूला सारून एकतर्फी निर्णय घेतले जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि निष्पक्षतेबाबत जनतेच्या मनात प्रश्न निर्माण झाले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मतदार याद्यांमधील कथित अनियमितता आणि ईव्हीएमच्या वापराबाबतही निवेदनात प्रश्न उपस्थित करण्यात आले. लोकशाहीवरील जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी निवडणूक प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तातडीने राजीनामा द्यावा, त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, संपूर्ण रक्क्ष प्रक्रिया रद्द करावी तसेच देशातील आगामी निवडणुका मतपत्रिकेद्वारे घेण्यात याव्यात, अशा मागण्या राष्ट्रवादीच्या वतीने करण्यात आल्या.

दरम्यान, राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडेही मोर्चादरम्यान लक्ष वेधण्यात आले. राज्य सरकारने शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्याचे जाहीर केले असले तरी किती मदत देणार आणि ती कधी मिळणार, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याचा आरोप अनिल देशमुख यांनी केला. सरकारकडून केवळ पंचनामे सुरू असल्याचे सांगितले जात आहे. सरसकट मदत देणार असे जाहीर केले असेल तर पंचनामे करण्याची आवश्यकता काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून खरीप हंगामाबरोबरच आगामी रब्बी हंगामही संकटात सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची गरज असल्याचे सांगत प्रति हेक्टर एक लाख रुपये आणि तीन हेक्टरपर्यंत सरसकट मदत देण्यात यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

या मोर्चाद्वारे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, लोकशाही संस्थांची स्वायत्तता आणि शेतकऱ्यांच्या तातडीच्या आर्थिक दिलासा या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले. मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिके करपली, शेतकरी संकटात : बल्लारपूर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर -धनंजय पांढरे**

पावसाने पाठ फिरवल्याने बल्लारपूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला असून, शेतशिवारातील पिके करपून शेतकरी आर्थिक संकटाच्या गर्तेत सापडला आहे. अशा परिस्थितीत बल्लारपूर तालुक्याला दुष्काळग्रस्त जाहीर न करणे हा शेतकरी आणि शेतमजुरांवर अन्याय असल्याचा संताप व्यक्त करीत शहर विकास आघाडीने तालुका तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी केली आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्यामुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिकांना आवश्यक पाणी मिळाले नाही. परिणामी पिकांची मोठ्या प्रमाणात हानी झाली असून शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या शेतमजुरांच्या रोजगारावरही त्याचा परिणाम झाला आहे. त्यामुळे शासनाने केवळ शेतकऱ्यांचाच नव्हे, तर शेतमजुरांचाही विचार करून



मदतीचे पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

राज्य शासनाने २६५ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची घोषणा केली आहे. मात्र, चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी, जिवती आणि बल्लारपूर या तालुक्यांना या यादीतून वगळण्यात आले आहे. प्रत्यक्षात बल्लारपूर तालुक्यातील गावागावांत पावसाअभावी पिकांचे नुकसान झाले असताना तालुका दुष्काळग्रस्त यादीत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर शहर विकास आघाडीचे अध्यक्ष तथा नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष भारत थुलकर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने नायब तहसीलदार महेंद्र फुलझेले यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठविले. बल्लारपूर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी. तसेच शेतीतील कामे घटल्याने रोजगारापासून वंचित झालेल्या शेतमजुरांनाही शासनाने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.यावेळी भारत थुलकर, धर्मेंद्र गायकवाड, अशोक पाटील, वाजीद खान, आसीफ शेख, शरद वानखेडे, सरफराज शेख, सम्राट थुलकर, नरेंद्र हिरे, रवी वनकर आदी उपस्थित होते.

थोडक्यात

## बँगलोर येथील डॉक्टर मंडळींकडून घोटमुंढरी जि. प शाळेला १०,००० रुपये देणगी



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

घोटमुंढरी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा जि. प शाळेच्या विद्यार्थ्यांची सकाळ सायंकाळ मोफत शिकवणी घेणारे डॉ.रंगारी यांचेकडे आलेले पाहुणे डॉ. भारती वेदक, मुलगा महेश वेदक, सून संजना महेश वेदक, सातोना गावाजवळील मांडेसर येथील डॉ.मते यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा घोटमुंढरी येथे भेट दिली असता संपूर्ण शाळा व सुविधा, विद्यार्थी अनुभव घेतले असता शाळेची कौतुकास्पद स्तुती केली आणि शहरात नसेल अशी शाळा ग्रामीण भागातील या गावात आहे याचे आश्चर्य व्यक्त केले.हे सर्व डिजिटल साधने, विद्यार्थी,शाळा बघून त्यांनी माझे काही या शाळेला देणे आहे असे समजून, ही भावना मनात आणून, शाळेला मदत म्हणून महेश वेदक यांनी स्वेच्छेने १०,००० (अक्षरी दहा हजार)रुपये देणगी दिली.

याप्रसंगी मुख्याध्यापक विकास घारगावे , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उदय पांडे,सर्व शिक्षक वृंद,शाळा व्यवस्थापन समिती चे सर्व सदस्यांच्यावतीने या मोलाच्या कायासाठी आलेल्या उपस्थित सर्व पाहुण्यांचे स्वागत,सत्कार करण्यात आले. भेट द्यायला आलेल्या पाहुण्यांनी शाळेच्या भेटी रजिस्टर वर शाळेबद्दल च्या आपल्या भावना,अनुभव थोडक्यात इंग्रजीत नोंद सुद्धा केले. ती इंग्रजीत केलेली नोंद त्यांनी स्वतः विद्यार्थ्यांसमोर प्रत्यक्ष वाचन करून दाखवावे अशी विनंती करण्यात आली आणि त्यांनी ते वाचन करीत शाळा,शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती,विद्यार्थी आणि गावकऱ्यांचे कौतुक करीत विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी मार्गदर्शन करीत शुभेच्छा देऊन आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी शाळेच्या वतीने सर्वांनी त्यांचे आभार मानले.

## नवरात्रोत्सवात नियमांचा भंग नको!

### देवी मंडळांच्या बैठकीत एपीआय अजितसिंग देवरे यांच्या सूचना; सीसीटीव्ही, अग्निशमन यंत्रणा अनिवार्य



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

आगामी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी भिवापूर पोलीस ठाण्यात तालुक्यातील दुर्गादेवी मंडळांच्या अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक बुधवारी (७ ऑक्टोबर) घेण्यात आली. उत्सव भक्तिभावाने साजरा करा; मात्र नियमांचे उल्लंघन करून कायदा-सुव्यवस्थेला बाधा आणू नका, अशा सूचना सहाय्यक पोलीस निरीक्षक अजितसिंग देवरे यांनी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना दिल्या. बैठकीत देवी मंडप उभारण्यापूर्वी नगरपंचायत अथवा ग्रामपंचायत तसेच पोलीस ठाण्याची आवश्यक परवानगी वेळेत घेणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मंडपाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, अग्निशामक यंत्रणा तसेच महिलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

ध्वनिप्रदूषणाचा मुद्दाही बैठकीत गांभीर्याने मांडण्यात आला. डीजे व ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे. रात्री १० नंतर ध्वनिवर्धक बंद ठेवावेत, अशा स्पष्ट सूचना पोलिसांनी दिल्या. तसेच देवी विसर्जन मिरवणुकीचा मार्ग व वेळ निश्चित करताना पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. दरम्यान, सोशल मीडियावर अथवा अन्य माध्यमातून पसरणाऱ्या अफवांवर विश्वास न ठेवता कोणतीही संशयास्पद माहिती थेट पोलिसांच्या निदर्शनास आणावी. नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा व बंधुभाव कायम ठेवण्याचे आवाहनही एपीआय देवरे यांनी केले. बैठकीस तालुक्यातील विविध दुर्गादेवी मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ऑफ्रोहच्या राज्याध्यक्षपदी डॉ. दीपक केदार, नरेंद्र निमजे महासचिव; २०२७ ते २०२९ साठी नवीन राज्य कार्यकारिणीची निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**



ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन (ऑफ्रोह) महाराष्ट्रच्या अमरावती येथे झालेल्या राज्यव्यापी अधिवेशनात २०२७ ते २०२९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी नवीन राज्य कार्यकारिणीची निवड करण्यात आली. राज्याध्यक्षपदी अमरावतीचे डॉ.दीपक केदार, तर महासचिवपदी नागपूरचे नरेंद्र निमजे यांची निवड करण्यात आली. आमदार प्रवीणभाऊ तायडे यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन झाले. यावेळी अमरावती महानगरपालिकेच्या शिक्षण सभापती ॲड. प्रितीताई हर्षल रेवणे, माजी राज्याध्यक्ष शिवानंद सहारकर आणि विद्यमान राज्याध्यक्ष राजेश सोनपरोते यांची प्रमुख उपस्थिती होती. आदिवासींच्या संवैधानिक हक्कांसाठी ऑफ्रोहच्या माध्यमातून सुरू असलेल्या लढ्याला सहकार्य करण्याचे आश्वासन आमदार तायडे यांनी दिले.

ॲड. रेवणे यांनीही अन्यायग्रस्त आदिवासींच्या शैक्षणिक व न्यायिक हक्कांच्या संरक्षणासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले. नवीन कार्यकारिणीत राज्य कार्याध्यक्षपदी सोलापूरचे सुधाकर सुसलादी, कोषाध्यक्षपदी अमरावतीचे मनीष पंचगाम यांची निवड झाली. महिला आघाडीच्या राज्याध्यक्षपदी मुंबईच्या प्रियाताई खापरे, महासचिवपदी पुण्याच्या वनिता नंदनवार, कार्याध्यक्षपदी साताऱ्याच्या भारती धुमाळ आणि कोषाध्यक्षपदी बुलढाण्याच्या पुष्पाताई कोळी यांची निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित राज्याध्यक्ष डॉ. दीपक केदार हे महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील वर्ग-१ अधिकारी असून लेखा व कोषागार संचालनालयाच्या सहसंचालक पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत.

विविध प्रशासकीय पदांवर त्यांनी काम केले असून विद्यार्थी दशेपासूनच त्यांना साहित्य व पत्रकारितेची आवड आहे. त्यांनी आदिवासी समाजाचे मुखपत्र आदिम या मासिकाचे संपादक म्हणूनही काम केले आहे.

अधिवेशनाला नागपूर जिल्ह्यातून विभागीय अध्यक्ष प्रेमदास नंदनवार, जिल्हाध्यक्ष दामोदर खडगी, जिल्हा सचिव नरेंद्र निमजे, कोषाध्यक्ष प्रवीण मदनकर, उपाध्यक्ष मधू पराड, महिला आघाडीच्या सचिव वैशाली कुंभारे यांच्यासह पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. डॉ. दीपक केदार यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

## पतीकडून पत्नीची दगडाने ठेचून हत्या

**कळंब** : तालुक्यातील पिंपळगाव (डोळा) येथील रहिवासी तथा हल्ली शहरातील पुनर्वसन सावरगाव परिसरात वास्तव्यास असलेल्या दाम्पत्यातील वादाचा धक्कादायक अंत झाला. पतीने पत्नीला येरमाळा रस्त्यावर पेट्रोल पंपासमोर खुल्या जागेत नेले. तिथे पत्नीचे व्हीडीओ काढले. नंतर पतीने दगडाने मारहाण करून तिची हत्या केल्याची खळबळजनक घटना बुधवार दि. ७ ऑक्टोबर रोजी रात्री साडेसात वाजनेच्या दरम्यान उघडकीस आली. या घटनेने शहरासह तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी कळंब पोलिस पती टेकाळे याचा रात्री उशीरा पर्यंत शोध घेत असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार टेकाळे कुटुंब शहरातील पुनर्वसन सावरगावं भागात गेल्या अनेक वषार्पासून वास्तव्यास असून अनैतिक प्रकारातून कोमल टेकाळे हिची पतीने हत्या केल्याची घटना घडली असल्याची चर्चा आहे.

## बल्लारपूरमध्ये १ हजार परवडणाऱ्या घरकुलांचा मार्ग मोकळा होणार : म्हाडाकडून कार्यवाहीचे आश्वासन

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर :-(धनंजय पांढरे )**

बल्लारपूर शहरातील सर्वसामान्य आणि गरजू कुटुंबांना हक्काचे, परवडणारे घर मिळावे यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुंबईत म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांची भेट घेऊन बल्लारपूरमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत १ हजार घरकुले उभारण्याची मागणी केली. या प्रस्तावावर तातडीने प्रशासकीय कार्यवाही सुरू करण्याची मागणी त्यांनी केली असून, जयस्वाल यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. बल्लारपूर शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू कुटुंबांसाठी परवडणाऱ्या घरांची गरज लक्षात घेऊन हा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अनेक कुटुंबांना परवडणाऱ्या घरांची प्रतीक्षा आहे. त्यामुळे प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून १ हजार घरकुलांचा प्रकल्प पुढे नेण्यासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली.

घरकुल हा केवळ चार भिंतींचा विषय नसून कुटुंबाच्या सुरक्षितता, स्थैर्य आणि सन्मानाशी जोडलेला प्रश्न आहे. त्यामुळे बल्लारपूरमधील गरजू नागरिकांना घर उपलब्ध करून देताना प्रकल्पाच्या अंमलबजावणीला वेग मिळावा, यासाठी म्हाडाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी आ. मुनगंटीवार यांनी सविस्तर चर्चा केली. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देताना संजीव जयस्वाल यांनी पुढील कार्यवाहीसाठी येत्या तीन दिवसांत झूम बैठक घेण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे बल्लारपूरमधील १ हजार परवडणाऱ्या घरकुलांच्या प्रस्तावाला प्रशासकीय पातळीवर पुढील दिशा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बल्लारपूरमधील गरजू कुटुंबांना स्वतःचे हक्काचे घर मिळावे, या उद्देशाने हा प्रस्ताव पुढे नेण्यात आला असून, आगामी कार्यवाहीकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## अखेर थ्री फेज लाईन २० तास मंजूर!

### चाचेर येथील भाजपा किसान आघाडी जिल्हा मंत्री रामटेक (ग्रामीण) विनोद कोपरकर यांच्या सतत पाठपुराव्याला यश

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

चाचेरसह रामटेक आणि मौदा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून शेती पंपासाठी केवळ १२ तास वीज मिळत असल्याने धान पेरणी आणि रोवणीच्या काळात शेतकरी संकटात सापडला होता.

या गंभीर समस्येला वाचा फोडण्यासाठी चाचेर येथील भाजपा किसान आघाडी रामटेक जिल्हा (ग्रामीण) चे मंत्री विनोद जगन्नाथ कोपरकर यांनी दि. ०३/०८/२०२४ रोजी चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य व मुख्य अभियंता, विद्युत विभाग, नागपूर यांना सविस्तर निवेदन दिले होते. खरीप हंगामात धान पिकाला मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज असते, पावसाचा खंड पडल्याने शेतकरी पूर्णपणे विहीर व बोअरवेलच्या कृषी पंपावर अवलंबून आहे, परंतु थ्री-फेज लाईन वेळेवर न मिळाल्याने मोटार पंप चालत नाहीत आणि रोवणी केलेले धान करपण्याची भीती आहे, असे त्यांनी पत्रात नमूद केले होते. याबाबत ते सतत पाठपुरावा करत होते.

त्या पत्राची दखल घेत अखेर शासनाने मोठा निर्णय घेतला आहे.

आता शेतकऱ्यांना रात्री १० वाजेपासून ते दुसऱ्या दिवशी सायंकाळी ६ वाजेपर्यंत सलग २० तास थ्री फेज वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. यामुळे सिंचनाच्या कामाला मोठी गती मिळणार असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

निर्णयाबद्दल चाचेरच्या सरपंचा लुंबिनी महेश कलारे, सुरेश खंडाईत, प्रल्हाद काळे, अनंता काळे, व्यंकट जुजारप्पू, प्रकाश वाकलपुडी, सुरेश काळे, योगराज घोरपडे, महेश महादुले, नरेश बादुले, बाळा खंडाईत, राजू धोटे, प्रभाकर दरवई, मोरेश्वर किरपान, कृष्णाजी नागमोते, वासुदेव सोमकुवर, निलकंठ बावनकुळे, चिंटू सोमनाथे यांच्यासह समस्त शेतकऱ्यांनी महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि या मागणीचा सतत पाठपुरावा करणारे सामाजिक कार्यकर्ते विनोद कोपरकर यांचे आभार मानले आहेत.

"शेतकरी सुखी तर देश सुखी. शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेल्या प्रयत्नाला यश आले याचे समाधान आहे," अशी प्रतिक्रिया विनोद कोपरकर यांनी दिली.

## उमरेडमध्ये कंपनीच्या गोदामावर 'चोरट्यांची नजर', औषध निर्मितीचे १.२० लाखांचे मुद्देमाल लंपास

### पोलिसांच्या तपासाला यश, चार आरोपी जेरबंद, विविध गुन्ह्यांतील ९ लाख ३५ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उमरेड येथील प्लॉट क्रमांक डी-३३ येथे असलेल्या विश्वम पेट्रो केमिकल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या गोदामावर चोरट्यांनी डल्ला मारून औषधनिर्मितीसाठी वापरण्यात येणारा तब्बल १ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणाचा छडा लावत उमरेड पोलिसांनी चार आरोपींना अटक केली असून, त्यांच्या ताब्यातून विविध गुन्ह्यांतील एकूण ९ लाख ३५ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



तक्रारदार सौरभ अनिल खंगार यांच्या फियार्दीनुसार, कंपनीमध्ये विविध औषधनिर्मितीची कामे केली जातात. दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी काम सुरू करून सायंकाळी ७ वाजता कंपनी बंद करण्यात आली. कंपनीचे प्रवेशद्वार तसेच गोदामाला कुलूप लावून कर्मचारी घरी गेले. मात्र, अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळी गोदामाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि तेथे ठेवलेला सुमारे १ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

घटनेची माहिती मिळताच उमरेड पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान अभिषेक ईश्वर कंगाले वय २६, रा. तेलकवडी, ता. उमरेड, राहुल रामरावजी कोडापे वय ३६, रा. घोटी, ता. नागपूर, दिनेश गोपाल मसराम वय ३९, रा. निलज, ता. पवनी, जि. भंडारा आणि वैभव गणपतराव सोनटक्के वय २९, रा. बुडदीबोरी यांना अटक करण्यात आली.

चौकशीदरम्यान आरोपींनी या गुन्ह्याव्यतिरिक्त उमरेड पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या अन्य गुन्ह्यांचीही कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल कबाडी दुकानदार गणेश दुर्गाप्रसाद शाह, रा. नागपूर याला विकल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी संबंधित मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत विविध गुन्ह्यांमधील आतापर्यंत ९ लाख ३५ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, या प्रकरणातील इतर साथीदारांचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक अनिल मस्के आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मयांक माधव यांच्या मार्गदर्शनाखाली उमरेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनाजी जळक यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसह सायबर शाखेच्या पथकानेही सहभाग घेतला.

## एसआयआरमुळे मतदारसंघाबाहेरील मतदाराला मतदानासाठी आणण्याचा खर्चही वाचणार

### मौदा तालुक्यातील गांगनेरसह गावागावातील पानटपऱ्यांवर सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या चर्चेला उधाण

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

एसआयआर प्रक्रियेमुळे मतदान यादीतून मृत्यू पावलेले मतदार, लग्न व इतर कारणामुळे स्थलांतरित झालेले मतदार व इतरही कारणामुळे मतदारांची नावे वगळण्यात आली आहे. महाराष्ट्रात जवळपास दोन कोटी तर संपूर्ण देशात जवळपास सात कोटी मतदारांची नावे वगळण्यात आली आहे. एसआयआर प्रक्रियेत काही चुकून राहिलेले मृत्यू पावलेले व स्थलांतरित झालेले मतदारांची नावे सुनावणी दरम्यान वगळण्यात येणार असल्याचे बीएलओ यांनी सांगितले. त्यामुळे एसआयआर



प्रक्रियेच्या पारदर्शतेवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी तालुका, जिल्हा, राज्य व देशात कांग्रेस जनता पार्टीसह विरोधी पक्षातर्फे आंदोलने सुरू आहेत.

मात्र गावातील लग्न झालेल्या मुली मतदान करायला आणण्यासाठी दहा लाखाची गाडी घेऊन जाणे व जावयाच्या खिशात ५०० ची नोट टाकण्याच्या खर्च एसआयआर मुळे सर्वच पक्षांच्या उमेदवारांच्या वाचला! अशा चर्चेला मौदा तालुक्यातील गांगनेरसह गावागावातील पान टपऱ्यांवर उधाण आलेले आहे, हे विशेष!

# पदवीधरांच्या रोजगारासाठीचा वसा पुढेही सुरू ठेवणार : ॲड. अभिजित वंजारी

**रोजगार मेळाव्यांची व्याप्ती वाढविण्याचा निर्धार; नागपूर विभागातील सहाही जिल्ह्यांत सातत्याने उपक्रम**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात झाल्यानंतर काँग्रेस व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार ॲड. अभिजित गोविंदराव वंजारी यांनी पदवीधरांच्या रोजगाराचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवला आहे. मागील सहा वर्षांपासून नागपूर विभागातील सहाही जिल्ह्यांमध्ये पदवीधरांसाठी रोजगार मेळावे आयोजित करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून अनेक युवक-युवतींना रोजगाराच्या संधी मिळाल्या असून, हा वसा आगामी काळातही कायम ठेवण्याचा निर्धार ॲड. वंजारी यांनी व्यक्त केला आहे.



पदवीधर युवकांना शिक्षणानंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी थेट कंपन्या आणि उमेदवार यांच्यातील दुवा निर्माण करण्याच्या उद्देशाने या रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले. विविध क्षेत्रांतील कंपन्यांना एका व्यासपीठावर आणून पात्र उमेदवारांच्या थेट मुलाखती घेण्यात आल्या. निवड झालेल्या उमेदवारांना अनेक ठिकाणी मेळाव्यातच ऑफर लेटर देण्यात आले. मागील सहा वर्षात झालेल्या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून हजारो युवांना रोजगार प्राप्त झाला आहे.

पदवी मिळाल्यानंतर युवक-युवतींना रोजगाराची संधी मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. केवळ पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणे एवढीच माझी भूमिका नसून, या मतदारसंघातील पदवीधरांच्या अडचणी समजून घेऊन त्यांच्यासाठी प्रत्यक्ष काम करण्याला माझे प्राधान्य आहे. गेल्या सहा वर्षांपासून सहाही जिल्ह्यांत रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. हा वसा पुढील काळातही सुरू ठेवणार असून, रोजगार मेळाव्यांची व्याप्ती आणखी वाढविणार आहे,ह्व असे ॲड. अभिजित वंजारी यांनी सांगितले.

नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि भंडारा या सहाही जिल्ह्यांतील पदवीधर युवक-युवतींना त्यांच्या शैक्षणिक पात्रता आणि कौशल्यानुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी भविष्यात अधिक कंपन्यांचा सहभाग वाढविण्याचे तसेच रोजगार मेळाव्यांचे स्वरूप अधिक व्यापक करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिक्षण, रोजगार, कौशल्यविकास आणि करिअरच्या संधी हे पदवीधरांच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय असून, या प्रश्नांवर सातत्याने काम करण्याची भूमिका ॲड. वंजारी यांनी मांडली आहे. रोजगार मेळाव्यांमधून मिळालेल्या प्रतिसादाच्या आधारे आगामी काळात अधिकाधिक पदवीधरांपर्यंत रोजगाराच्या संधी पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे.

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातील प्रचाराला सुरुवात झाल्याने सहाही जिल्ह्यांतील पदवीधरांशी थेट संवाद साधण्यावर तसेच त्यांच्या प्रश्नांची माहिती घेण्यावर भर दिला जात आहे. रोजगाराच्या संधी निर्माण करण्याबरोबरच पदवीधरांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्याची भूमिका ॲड. वंजारी यांनी व्यक्त केली आहे.

थोडक्यात

## भिष्णूर प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. अभिजीत पाचपोर यांचा सत्कार

**दोन वर्षांच्या प्रामाणिक सेवेला निरोप; मनमिळाऊ स्वभावामुळे रुग्ण व ग्रामस्थांच्या मनात निर्माण केली आपुलकी**



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील भिष्णूर प्राथमिक आरोग्य केंद्र येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेले डॉ. अभिजीत पाचपोर यांची बदली झाल्याने त्यांच्या दोन वर्षांच्या प्रामाणिक व सेवाभावी कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन त्यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.
डॉ. अभिजीत पाचपोर यांनी भिष्णूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वर्षे सेवा बजावताना ग्रामीण भागातील रुग्णांना तत्पर आरोग्यसेवा देण्यावर भर दिला. रुग्णांशी आपुलकीने संवाद साधत त्यांच्या समस्या समजून घेऊन उपचार करण्याच्या त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे ते नागरिकांमध्ये परिचित झाले. त्यांच्या कार्यकाळात आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांना चांगली सेवा देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.
यावेळी माजी सभापती पंचायत समिती नरखेड निलीमा रेवतकर यांनी मनोगत व्यक्त करताना डॉ. पाचपोर यांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले. डॉ. पाचपोर यांनी दोन वर्षांच्या कार्यकाळात भिष्णूर परिसरातील नागरिकांना आपुलकीने आरोग्यसेवा दिली. रुग्णांशी त्यांचा असलेला जिव्हाळा आणि मनमिळाऊ स्वभाव कायम स्मरणात राहील. ग्रामीण भागात सेवा करताना त्यांनी दाखविलेली तत्परता आणि प्रामाणिकपणा कौतुकास्पद आहे. बदलीनंतरही त्यांच्या कार्याची आठवण नागरिकांना राहील, असे निलीमा रेवतकर यांनी सांगितले. सत्कार समारंभास डॉ. उमेश देशमुख, सतीश रेवतकर तसेच अन्य पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. पाचपोर यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांच्या पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. बदलीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभातून डॉ. अभिजीत पाचपोर यांच्या दोन वर्षांच्या सेवेला नागरिकांनी दिलेला स्नेह आणि आदर अधोरेखित झाला.

## उन्हाळ्याआधीच पाणीटंचाईचा धोका!

**सालेभट्टी-सालेशहरीत तहसीलदारांची पाहणी, अतिरिक्त जलस्रोत तातडीने उभारण्याचे निर्देश**



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच संभाव्य पाणीटंचाईचे संकट लक्षात घेऊन प्रशासनाने पाणी नियोजनाला सुरुवात केली आहे. मौजा सालेभट्टी-सालेशहरी येथे तहसीलदार संजय राठोड यांनी ५ ऑक्टोबर रोजी भेट देऊन गावातील पाणीपुरवठा योजनेची पाहणी केली. सध्याची परिस्थिती आणि आगामी उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. गावातील विद्यमान पाणीपुरवठा व्यवस्था, उपलब्ध जलस्रोत तसेच भविष्यात उद्भवू शकणाऱ्या पाणीटंचाईबाबत तहसीलदार राठोड यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली. पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा आतापासूनच पर्यायी व्यवस्था उभी करा, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.
गावाला भविष्यात भेडसावणारी पाणीटंचाई लक्षात घेऊन अतिरिक्त पाण्याचे स्रोत निर्माण करून त्याद्वारे गावाला पाणीपुरवठा करण्याचे काम पाणीटंचाई कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित करावे आणि हे काम तातडीने पूर्ण करावे, असे स्पष्ट निर्देश तहसीलदारांनी दिले. यावेळी जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाचे उपविभागीय अभियंता अमित तुरकर, कनिष्ठ अभियंता घरडे, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील संभाव्य पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये प्रशासनाने आतापासूनच उपाययोजना राबविण्याची गरज व्यक्त होत आहे.

## स्वरचित बालकाव्य वाचन स्पर्धा शुक्रवार, ९ ऑक्टोबर रोजी

**बालकला अकादमीतर्फे विविध स्पर्धांचे आयोजन**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
बालकला अकादमी आणि स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्वरचित बालकाव्य वाचन स्पर्धा शुक्रवारी, ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा, महाल येथे होणार आहे. ही स्पर्धा अ व ब अशा दोन गटांत होणार असून अ गटात इयत्ता ५ वी ते ७ वी, तर ब गटात इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. प्रत्येक गटातून दोन विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल. कविता मराठी भाषेत आणि स्वरचित असणे आवश्यक आहे. कथाकथन स्पर्धा सोमवार, १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता याच ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. इयत्ता १ ली ते ४ थी आणि इयत्ता ५ वी ते ७ वी असे दोन गट असून अनुक्रमे बोधकथा व साहसी कथा हे विषय आहेत. याच दिवशी इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आंतरशालेय अभिवाचन स्पर्धा सकाळी ११ वाजता होणार आहे. कथा, कादंबरी, नाटक किंवा ललित साहित्य यापैकी निवडक साहित्याचे अभिवाचन करता येणार असून मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करता येईल. तिन्ही स्पर्धांतील विजेत्यांना भरघोस बक्षिसे दिली जातील.

## वरोरा पोलिसांची कारवाई, ६.५२० ग्रॅम मेफेड्रोन ड्रग्स जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा- धर्मेंद्र शेरकुरे** : वरोरा पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वरोरा पोलिसांनी मोहबाळा जिएमआर कंपनीच्या परिसरात कारवाई करून ६.५२० ग्रॅम मेफेड्रोन ड्रग्स जप्त केले. या कारवाईत एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून ड्रगसह बोलेरो पिकप वाहन असा एकूण पाच लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ५ ऑक्टोबर रोजी पोलिसांना डायल ११२ वर माहिती मिळाली की मोहबाळा परिसरात एक वाहनांमध्ये अमली पदार्थ असल्याची शक्यता आहे, त्यानंतर पोलिसांनी माहितीची खात्री करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली व पंचासह कारवाईसाठी पथक रवाना झाले. पोलीस पथकाला मोहबाळा ते जिएमआर कंपनीच्या रोडने पोलीस रवाना झाले,त्याच रस्त्याच्या कडेला पठाण यांचा गाईंचा गोठा आहे. गोठ्याजवळ MH 27 BX -5703 बोलेरो पिकअप वाहन आढळून आले.
वाहनांची झडती घेतली असता काळ्या प्लास्टिक मध्ये पांढऱ्या प्लास्टिकच्या जीप पाऊचमध्ये पांढऱ्या भुकट रंगाची पावडर आढळली. तपासाअंती ती पावडर ड्रग्स असल्याचे नमूद करण्यात आले आहे. कारवाईत दीपक मधुकर खारकर वय ४५ वर्ष व्यवसाय चालक राहणार टाकळी तालुका वरोरा यांच्याकडून ६.५२० ग्रॅम मेफेड्रोन ड्रग्स त्याची किंमत ६५ हजार रुपये तसेच पाच लाख रुपये किमतीचे बोलेरो पिकप वाहन असा एकूण पाच लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी वरोरा पोलीस ठाण्यात अमली पदार्थ व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ मधील कलम ८ क व २१ ब अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास वरोरा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद भस्मे हे करीत आहे.

## पोलीस स्टेशन तुमसर हद्दीतील २ सराईत गुन्हेगार एक वर्षाकरिता स्थानबद्ध

**एमपीडीए कायद्यान्वये तुमसर येथील दोन आरोपीवर कारवाई**



**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**
भंडारा जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक मा. नूरुल हसन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन तुमसर हद्दीतील दोन सराईत आरोपींविरुद्ध स्थानबद्धतेची कार्यवाही प्रस्तावित केली होती. सराईत गुन्हेगार आकाश उर्फ डिकरा रमेश महालगावे वय ३० वर्ष रा. अभ्यंकर नगर तुमसर व किरन उर्फ लारा अशोक मारबते वय ३० वर्ष रा. माकडे नगर तुमसर सदर आरोपी हे वारंवार गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून परिसरातील नागरिकांमध्ये दहशत निर्माण करीत होते. त्यांच्याविरुद्ध दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांचा तसेच त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांचा आढावा घेऊन त्यांच्याविरुद्ध स्थानबद्धतेचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे सादर करण्यात आला होता.
सक्षम प्राधिकरणाने उपलब्ध पुरावे, गोपनीय माहिती व पोलीस अहवालांचा विचार करून आरोपी आकाश उर्फ डिकरा रमेश महालगावे रा. अभ्यंकर नगर तुमसर व आरोपी किरन उर्फ लारा अशोक मारबते वय ३० वर्ष रा. माकडे नगर तुमसर यांना महाराष्ट्र प्रतिबंधक कायद्यांतर्गत एक वर्षाकरीता स्थानबद्ध करण्याचे आदेश पारित केले आहेत. त्यानुसार दिनांक १९ सप्टेंगर रोजी आरोपी क्र. १ यास नागपुर मध्यवर्ती कारागृहात एक वर्षाकरीता व दिनांक ६ ऑॅक्टोंबर रोजी आरोपी क्र. २ यास ताब्यात घेऊन मा. सावन कुमार, जिल्हादंडाधिकारी भंडारा यांचे आदेशअन्वये जिल्हा कारागृह वर्धा कारागृहात एक वर्षाकरीता स्थानबद्ध करण्यात आले आहे. या कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारीवर आळा बसण्यास मदत होणार असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल. भविष्यातही सराईत गुन्हेगार, अवैध धंदे व समाजकंटकांविरुद्ध कठोर कारवाई सुरू राहणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाने दिली आहे.
सदर कारवाई नूरुल हसन पोलीस अधीक्षक, निलेश मोरे अपर पोलीस अधीक्षक, भंडारा, महेश पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी, अतिरीक्त कार्यभार, तुमसर, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुभाष बारसे, (ठाणेदार), पो. नी. बाळासाहेब आघाव, यांचे पर्यवेक्षणात प्रविण सयाम व पोलीस अंमलदार नितीन झंझाड, नामदेव बळदे, राजु गिरेपुंजे, विजय दमाहे,तिलक चौधरी,शैलेश रतनपुरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जवाहर विद्यार्थी गृहातर्फे २९० समाजबांधवांचा भव्य सत्कार

**गुणवंत विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, सुवर्णमहोत्सवी दाम्पत्य व विशेष कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव**



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
जवाहर विद्यार्थी गृह, नागपूरच्या वतीने समाजातील गुणवंत विद्यार्थी, पीएच.डी. धारक युवक-युवती, ७५ वर्षे पूर्ण करणारे ज्येष्ठ नागरिक, सुखी सहजीवनाची ५० वर्षे पूर्ण करणारे दाम्पत्य तसेच समाजासाठी विशेष योगदान देणाऱ्या व्यक्तींचा भव्य सत्कार समारंभ जवाहर विद्यार्थी गृह, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात तब्बल २९० समाजबांधवांचा सत्कार करण्यात आला.
या कार्यक्रमास निवृत्त न्यायाधीश मुरलीधर गिरडकर, किशोर वरंभे, उपाध्यक्ष, श्री क्षेत्र रामटेक तेली समाज धर्मशाळा, धर्मराज रेवतकर, ॲड. नरेंद्र ढगे, अध्यक्ष, तेली समाज सभा, ॲड. जगदीश गायधने, माजी कोषाध्यक्ष, जवाहर विद्यार्थी गृह, डॉ. संजय दुधे, माजी प्र-कुलगुरू, डॉ. संजय ढोबळे, विभाग प्रमुख, भौतिकशास्त्र, श्याम वैद्य, तसेच माजी विश्वस्त डॉ. सौ. विजया बालपांडे, अरुण वैद्य आणि माजी कोषाध्यक्ष अजबराव काळबांडे, श्री बारई साहेब, निवृत्त उपसंचालक टाउन प्लानिंग यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या २९० समाजबांधवांचा सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिक आणि ५० वर्षांचे वैवाहिक जीवन पूर्ण करणाऱ्या दाम्पत्यांचा सन्मान करून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला.
यावेळी उपस्थित मान्यवरांनी समाजातील गुणवंतांचा सन्मान करण्याची ही परंपरा कौतुकास्पद असल्याचे सांगत, अशा उपक्रमांमुळे नवीन पिढीला प्रेरणा मिळते आणि समाजातील विविध क्षेत्रांतील कर्तृत्वाला व्यासपीठ मिळते, असे मत व्यक्त केले.
कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र कुमार दिवटे, मुख्य कार्यवाह हर्षवर्धन बेले आणि कोषाध्यक्ष बालानंद टपरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यकारिणी सदस्य प्रवीण आंबागडे, सौ. प्रज्ञा बडवाईक, प्रकाश तिळगुळे, प्रफुल्ल रेवतकर, विजय मोटघरे, देवेंद्र वाडीभस्मे, हरीश जयपूरकर, लोकनाथ भुरे आणि रवी उराडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा. रमेश पिसे व हरीश दांडेकर यांनी केले. जवाहर विद्यार्थी गृहाच्या वतीने आयोजित या सत्कार समारंभामुळे गुणवंतांचा गौरव, ज्येष्ठांचा सन्मान आणि समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्याचा सकारात्मक संदेश समाजात पोहोचला.

## खराळ्यात जागतिक कापूस दिन उत्साहात, शाश्वत शेतीतून समृद्धीचा मार्ग!

**ॲग्रिजेनिक एफपीसी व विजय कॉटन अँड फायबर कंपनीचा संयुक्त उपक्रम, कापूस उत्पादकांना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन**

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
जागतिक कापूस दिनानिमित्त ॲग्रिजेनिक फार्मर प्रोड्यूसर कंपनी आणि विजय कॉटन अँड फायबर कंपनी एलएनलपी यांच्या संयुक्त विद्यमाने, एड बाय ट्रेड फाऊंडेशनच्या सहकार्याने नरखेड तालुक्यातील खराळा येथे कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. 'कापूस - शेतकऱ्यांच्या समृद्धीचा आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचा आधार' हा संदेश देत शेतकऱ्यांना कापूस उत्पादनातील आधुनिक व शाश्वत तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली.
ॲग्रिजेनिक शेतकरी उत्पादक कंपनीच्या रेजेनेरेटिव्ह कॉटन स्टँडर्ड्स प्रकल्पांतर्गत आयोजित या कार्यक्रमात कापूस पिकामध्ये पुनरुत्पादक व शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करण्यावर विशेष भर देण्यात आला. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर मातीचे आरोग्य टिकविणे, जमिनीची सुपीकता वाढविणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे, एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याच्या उपाय योजनांबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



कापूस पिकामध्ये रासायनिक निविष्ठांचा संतुलित वापर, जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढविणे, पिकांचे अवशेष व्यवस्थापन, पाण्याचे योग्य नियोजन तसेच हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती देण्यात आली. गुणवत्तापूर्ण कापूस उत्पादनाबरोबरच कापसाला योग्य बाजारपेठ मिळवून देणे, मूल्यवर्धन आणि कापूस मूल्यसाखळीत शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे यावरही मार्गदर्शन करण्यात आले.
कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी केवळ उत्पादन वाढविण्यावर भर न देता उत्पादन खर्चाचे नियोजन, गुणवत्तेवर भर आणि बाजारपेठेची माहिती घेणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब केल्यास जमिनीचे आरोग्य जपण्यासोबतच भविष्यातील शेती अधिक सक्षम व फायदेशीर होण्यास मदत होईल, असा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला.
कार्यक्रमास ॲग्रिजेनिक शेतकरी उत्पादक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आकाश धुंदे, खराळा गावचे सरपंच राहुलजी कामडी, माजी जि.प. सभापती प्रवीणजी जोध, भारसिंगी मंडळ कृषी अधिकारी गजानन धवले, कृषी पर्यवेक्षक बालपांडे, प्रकल्प व्यवस्थापक डॉ. बुद्धभूषण वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रकल्प अधिकारी विनोद निंबाळकर, अमोल जिवतोडे, क्षेत्र समन्वयक शुभम वानखडे, पंकज निंबाळकर, गौरव फंदी यांच्यासह मोठ्या संख्येने कापूस उत्पादक शेतकरी, महिला शेतकरी, ग्रामस्थ तसेच कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.
कार्यक्रमाच्या माध्यमातून कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये शाश्वत शेती, माती व पाणी संवर्धन, गुणवत्तापूर्ण उत्पादन आणि बाजारपेठेचे महत्त्व याबाबत सकारात्मक जनजागृती झाली. विजय कॉटन अँड फायबर कंपनी एलएनलपी व एड बाय ट्रेड फाऊंडेशनच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमाचे उपस्थित शेतकऱ्यांनी स्वागत केले.

थोडक्यात

## स्वच्छ भारत-सुंदर भारत रंगोली स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### महिलांनी रंगोलीतून दिला स्वच्छता व सामाजिक जागृतीचा संदेश



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत 'स्वच्छ भारत-सुंदर भारत' या विषयावर रंगोली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. बुधवारी पेठ येथील प्राथमिक शाळेत झालेल्या या स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भारतीय जनता पक्ष, उमरेड शहर मंडळाच्या वतीने स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, सामाजिक जागृती तसेच भारतीय संस्कृतीचा संदेश देणाऱ्या विविध आकर्षक रंगोळ्या स्पर्धक महिलांनी साकारल्या. रंगांच्या माध्यमातून स्वच्छता हीच सेवा स्वच्छ परिसर आणि सुंदर समाजाचा संदेश देत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविण्यात आले. श्रीमती विजयालक्ष्मी भदोरिया, माजी नगराध्यक्ष, उमरेड यांच्या सौजन्याने स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम रुपये १,००१, द्वितीय रुपये ७०१ आणि तृतीय रुपये ५०१ अशी पारितोषिके देण्यात आली. तसेच सहभागी सर्व स्पर्धकांना प्रोत्साहनपर पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत प्रथम पारितोषिक आराध्या मांडवकर, द्वितीय पारितोषिक बोरीकर तर तृतीय पारितोषिक मंगला भुसारी यांनी पटकाविले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागपूर जिल्हा उपाध्यक्षा मायाताई पाटील होत्या. यावेळी उमरेड शहर मंडळ अध्यक्ष सतीश भाऊ चौधरी, महामंत्री संजय चाचरकर, राकेश नौकरकर, नगरसेविका वैशाली बांदरे, महिला आघाडी अध्यक्षा नंदिनी वासुरकर, पूर्वाध्यक्ष रेणुका कामडी, महामंत्री मनिषा मुंगले, शिला झिल्पे, श्वेता मोहोड, करुणा शिरपुरकर, उपाध्यक्षा सविता गिरडे, संगिता फेदजवार, किरण मेश्राम, निधी नौकरकर, मनिषा येवले, मंजू धमेरिया यांच्यासह महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या. महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच स्वच्छता व सामाजिक जबाबदारीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन सविता गिरडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संगिता फेदजवार यांनी केले.

## स्वरशिल्पचा 'बंगाल से बॉलिवूड तक' उद्या

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

बंगालमधील समृद्ध संगीतपरंपरेपासून बॉलिवूडमधील लोकप्रिय गीतांपर्यंतचा संगीतप्रवास उलगडणारा 'बंगाल से बॉलिवूड तक' हा विशेष संगीत कार्यक्रम 'स्वरशिल्प'तर्फे शुक्रवारी, ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.१५ वाजता सायंटिफिक हॉल, लक्ष्मीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. स्वरशिल्पच्या संचालिका भाग्यश्री बारस्कर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पियाली बिस्वास उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात तनुजा सोनवणे, मृदुला पाटणकर, गौरी डोंगरे, कीर्ती बोकारे, पद्मश्री देशपांडे, प्रविणा ढवळे, डॉ. नीता भावे, अमी पटेल, प्राजक्ता देशपांडे, संगीता शेकातकर, सरिता पंडित, वैशाली तालेवार, आशा अनासने, अरुणा मार्कंडे, डॉ. वैशाली खंडाईत, भारती देशपांडे, अंकिता सोमानी, राधिका रानडे, अनिरुद्ध जोशी, मेघना जोशी आणि पल्लवी पाशिने हे गायक-कलाकार विविध गीते सादर करतील.

महेंद्र ढोले, नंदू गोहणे, प्रशांत नागमोते आणि नितीन अहिरे वाद्यसंगत करतील. कार्यक्रमाचे संचालन श्वेता शेलगावकर करणार आहेत. या विनामूल्य कार्यक्रमाला संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## डॉ. अंकुशकुमार धर्माधिकारी यांची 'कॅविऑन' या आंतरराष्ट्रीय कंपनीच्या चीफ बिझनेस ऑफिसरपदी निवड

### कंपनीच्या सर्वोच्च व्यवस्थापन टीममध्ये समावेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्राच्या मातीतून जागतिक स्तरावरील नेतृत्वाकडे एका मराठी तरुणाने घेतलेली असाधारण झेप सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. धोरणात्मक प्रशासकीय रणनीती आणि तंत्रज्ञानाची उत्तम जाण



असलेले डॉ. अंकुशकुमार धर्माधिकारी यांची 'कॅविऑन' या आंतरराष्ट्रीय कंपनीच्या 'चीफ बिझनेस ऑफिसर'पदी आणि कंपनीच्या सर्वोच्च व्यवस्थापन टीममध्ये निवड झाली आहे. अमरावती येथे जन्मलेले आणि सध्या कुटुंबासह मुंबई येथे वास्तव्यास असलेले डॉ. अंकुशकुमार धर्माधिकारी हे विज्ञान विषयाचे पदवीधर आहेत. त्यांनी लोकप्रशासन विषयात 'डॉक्टरेट' प्राप्त केली असून, शासनाच्या विविध समित्यांचे धोरणात्मक सल्लागार म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. प्रशासकीय अनुभव, तंत्रज्ञानाची जोड आणि व्यवसायाची धोरणनिर्मिती यांमधील त्यांच्या ८ वर्षांच्या अनुभवाच्या जोरावर त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर हे महत्त्वपूर्ण स्थान मिळवले आहे.

**आयच्या माध्यमातून प्रशासकीय क्रांतीचा मानस**

कृत्रिम बुद्धिमत्ता हे आगामी काळात शासन आणि सार्वजनिक सेवा व्यवस्थेचे स्वरूप बदलणारे महत्त्वाचे तंत्रज्ञान ठरणार आहे, असा विश्वास डॉ. धर्माधिकारी यांनी व्यक्त केला. सरकारी कार्यालयांतील किचकट प्रक्रिया सुलभ करणे. मोठ्या प्रमाणातील माहितीचे व्यवस्थापन आणि दस्तऐवजांचे विश्लेषण. नागरिकांच्या प्रश्नांना जलद प्रतिसाद देऊन वेळ आणि मनुष्यबळाची बचत करणे. "तंत्रज्ञान हे केवळ उद्योगांसाठी किंवा मोठ्या संस्थांसाठी नसून सामान्य नागरिकांचे जीवन अधिक सोपे करण्यासाठी असले पाहिजे," या विचारातून शासन आणि तंत्रज्ञान यांतील दरी कमी करण्याचा त्यांचा मानस आहे.

कॅविऑन या आंतरराष्ट्रीय कंपनीचे 'चीफ बिझनेस ऑफिसर' म्हणून ते कंपनीच्या व्यवसायविस्ताराची दिशा निश्चित करणे, धोरणात्मक भागीदारी निर्माण करणे आणि विविध संस्थांशी समन्वय साधणे या जबाबदाऱ्या सांभाळतील. सर्वोच्च व्यवस्थापन समितीचे सदस्य म्हणून ते भविष्यातील धोरणात्मक निर्णयप्रक्रियेतही महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.

# लोकप्रिय बॉलीवूड गीतांनी सजली 'बॉलीवूड क्लासिक'ची सुरेल संध्या

### श्री सिद्धिविनायक पब्लिसिटीची अविस्मरणीय प्रस्तुती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री सिद्धिविनायक पब्लिसिटीच्या वतीने बॉलीवूड क्लासिक या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी शंकरनगर येथील साई सभागृहात करण्यात आले. बॉलीवूडमधील लोकप्रिय आणि सदाबहार गीतांच्या सुरेल प्रस्तुतींनी रसिक मंत्रमुग्ध झाले. संगीतप्रेमींनी या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमाची सुरुवात समीर पंडित यांनी 'प्यार मांगा है तुम्ही से' या गीताच्या मधुर प्रस्तुतीने केली.

कार्यक्रमाला अतिथी गायिका म्हणून निकेता जोशी उपस्थित होत्या. यावर विजया वाइनडेस्कर यांनी 'ये मुलाकात', 'रंभा हो', डॉ. कल्याणी कापसे यांनी 'जादू है नशा है', मंजुषा दिवटे यांनी 'ये मेरा दिल यार का', समीक्षा चरडे यांनी 'ओ मेरे सोना रे', 'दिल तो है दिल', डॉ. अमृता पारोळकर यांनी 'आज की रात', 'मोरनी बागामा', वैशाली मून यांनी 'आओ ना गले लगाओ', नीरजा धांडे यांनी 'मन सात समंदर', शशिकांत वाघमारे यांनी 'जानम देख लो', हितेंद्र मून यांनी 'रुक जाना ओ जाना', सुनील माहूरकर यांनी 'जाने क्या सोचकर', पद्मशेकर यांनी 'चला जाता हूँ किसी के दिल पे', 'रूप तेरा मस्ताना' आणि विवेक प्रतापे यांनी 'फूलों के रंग से' या गीतांची प्रस्तुती देत रंगत वाढवली.

यानंतर कलाकारांनी 'दरिया किनारे', 'पर्वत से काली', 'वादा कर ले साजना', 'हम दोनों दो प्रेमी', 'तुम जो चले गए तो', 'सागर किनारे', 'मेरे प्यार की उमर', 'क्या यही प्यार है', 'प्यार करने वाले' यासारख्या अनेक सुरेल युगलगीतांचीही प्रस्तुती दिली. कीबोर्डवर परिमल जोशी, गिटारवर ऋग्वेद पांडे, ऑक्टोपॅडवर महेंद्र वटुळकर, ढोलकवर पंकज यादव आणि तुम्ब्यावर राजेश धामणकर यांनी सुरेल साथसंगत केली. कार्यक्रमाचे निवेदन व आभारप्रदर्शन समीर पंडित यांनी केले.







## १२ लाख ८६ हजार किंमतीच्या प्लास्टिक बॅग जप्त, मनपा व एमपीसीबीची संयुक्तपणे धडक कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथक व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) केलेल्या संयुक्त कारवाईत वर्धमाननगरातील एका आस्थापनेवर छापा मारून १२ लाख ८६ हजार ५०० रुपये किंमतीच्या प्लास्टिक बॅगचा मुद्देमाल जप्त करण्याची कारवाई केली. वर्धमाननगरातील बिग बास्केट टाटा इन्टरप्रायझेस वेअर हाऊसमधून ६ हजार ६५० किलोग्रॅम वजनाच्या प्लास्टिक बॅग या कारवाईत जप्त करण्यात आल्या. प्रथम प्रकरण असल्याने ५ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. वर्धमाननगरातील नंदूजी मानकर यांच्या मालकीच्या बिग बास्केट टाटा इन्टरप्रायझेसवर ही कारवाई मनपाच्या एनडीएसचे प्रमुख वीरसेन तांबे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे तांत्रीक सहाय्यक वैभव राऊत, प्रफुल वर्मा, पथक प्रमुख नत्थू खांडेकर, राजेंद्र मेश्राम, राणा प्रताप सिंग, विवेक बोबडे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. मनपाच्या उपद्रव पथकाने विविध आस्थापनांवर कारवाई करून दंड ७० हजार रुपयांच्या दंडाची वसुली केली. यात प्लास्टिक बंदी, विकासकांनी रस्त्यावर टाकलेले बांधकाम साहित्य, मनपाचे चेंबर कचऱ्याने बंद करण्याची कृती दिसून आल्याने कारवाई केली आहे.



आठ रस्ता चौकातील मेसर्स मंगेश दी ब्लिसने मनपाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे १० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. मानेवाडा भागातील मे. कटियार इंफ्रावर सुद्धा कारवाई करून १० हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. चिंचभवन भागात रस्त्याच्या कडेला बांधकाम साहित्य पसरविल्याच्या आरोपावरून मे. जे. पी. रेसिडन्सीवर १० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. त्याचप्रमाणे झिंगाबाई टाकळी परिसरातील गोल्डन मिडोजने मनपाच्या आदेशाचे उल्लंघन करून बांधकाम साहित्य रस्त्यावर टाकल्याच्या विरोधात कारवाई करून १० हजार रुपयांची वसुली केली आहे. याशिवाय मे. जयदुर्गा, श्री. बादल पांडे, मे. ओम डिस्पोझल अँड सेल्स, मे. वंदना किराणा स्टोअर, मे. गंगाचरण किराणा स्टोअरवर सुद्धा कारवाई करून प्रत्येकी ५ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. शहरात उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणे व कचरा पसरविणाऱ्यांच्या शहरात सर्व झोनमध्ये कारवाई करून ४१ हजार रुपयांचा दंड वसूल केला.

# प्रभार घेतल्याच्या आठवडाभरातच महिला पोलीस निरीक्षकाची धडाकेबाज कारवाई

### शेगाव पोलीस स्टेशनला मिळाल्या पहिल्यांदा महिला पोलीस ठाणेदार

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे**

शेगाव बु पोलिस यांनी चिमूर तालुक्यातील जामनी येथे मागील कित्येक महिन्यापासून सुरू असलेल्या जुगार अड्डयावर महिला ठाणेदार यांच्या मार्गदर्शनात धडाकेबाज कारवाई केलेली आहे.

हा जुगार अड्डा मागील कित्येक महिन्यापासून राजरोसपणे सुरू होता अद्यापही यावर कारवाई झालेली नव्हती मात्र शेगाव बु पोलीस स्टेशनचे नव्याने चार्ज घेतलेल्या लेडी सिंघम ठाणेदार भुते यांनी संबंधित जुगार अड्डयावर धडाकेबाज कारवाई केलेली आहे यामध्ये तिघांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून एक हजार सहाशे रुपये जुगार खेळण्यासाठी वापरण्यात आलेला ५२ पत्त्यांचा तास किंमत अंदाजे ३० रुपये पाच मोटरसायकली किंमत अंदाजे दोन लाख ९० हजार असा एकूण २.९१६३० रुपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जामणी गावातील तलावाजवळ तिरपाल टाकुन झोपडी तयार करून सुरू असलेल्या जुगार अड्डयावर शेगाव (बु.) पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत तीन जणांना ताब्यात घेण्यात आले असून, तीन जण पोलिसांना पाहून फरार झाले.

दिनांक ६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी शेगाव (बु.) पोलीस ठाण्याचे पथक परिसरात पेट्रोलिंग करीत जामणी गावाकडे जात असताना पोलिसांना नविन जामणी तलावाजवळ काही जण तास पत्त्यावर पैशांची बाजी लावून जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसह जामणी तलाव परिसरात जाऊन पाहणी केली असता तिरपालच्या झोपडीत काही जण गोलाकार बसलेले दिसून आले. पोलिसांनी अचानक धाड टाकली असता महेश गोमाजी आवारी (वय २८, रा. चिचघाट, ता. चिमूर), कैलाश वासुदेव आलाम (वय ४०, रा. जामणी) आणि गणेश आनंदराव पेंदाम (वय ३४, रा. जामणी) हे तिघे मिळून आले. तर अन्य तीन जण पोलिसांना पाहून घटनास्थळावरून पसार झाले. सूत्रांच्या माहितीनुसार हा जुगार भरवणारे सूत्रधार मात्र फरार असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. कारवाई केली त्यावेळेस जुगार खेळणाऱ्या एकाही जवळ मोबाईल फोन नसल्याचे दिसून आले.

पोलिसांनी पंचांसमक्ष जप्तीची कारवाई केली असून, संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गावामध्ये राजरोसपणे जुगार चालवण्याचा परवाना कोणाच्या आशीवार्दाने सुरू होता हे मात्र अजुनही गुलदस्त्यात आहे.

विशेष म्हणजे शेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत १०३ गावे जोडली गेली असून या गावाची लोकसंख्या ८७ हजार च्या जवळपास येत असते त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी अवैध धंदे फोपावलेली असून नव्याने रुजू झालेल्या लेडीज सिंघम पोलीस ठाणेदार शेगाव बुजमध्ये व जवळपास असलेल्या परिसरात दारू,सट्टा,अवैध वाळू, अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरू असल्यामुळे यावर सुद्धा महिला ठाणेदार योग्य कारवाईचा बळगा उचलणार का? असा प्रश्न परिसरातील नागरिकाकडुन उपस्थित करण्यात येत आहे.

## 'युगवाणी' विशेषांकाचे प्रकाशन व परिसंवाद ११ ऑक्टोबर रोजी

### कविवर्य नारायण सुर्वे जन्मशताब्दी निमित्त विशेष आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मराठी कवितेला आशय, विषय आणि अभिव्यक्तीची आगळीवेगळी वाट दाखविणारे जनकवी पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विदर्भ साहित्य संघाच्यावतीने



'युगवाणी'चा नारायण सुर्वे जन्मशताब्दी विशेषांक प्रकाशित करण्यात येणार आहे. यानिमित्त सुर्वे यांच्या बहुपैलू काव्याचा गौरव करण्यासाठी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, ११ ऑक्टोबर रोजी दुपारी ४.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, महाराष्ट्र राष्ट्रभाषा संकुल, शंकर नगर, नागपूर येथे होणार आहे. पदव्युत्तर मराठी विभागाच्या माजी विद्यार्थी संघटनेच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी राहणार असून, सुप्रसिद्ध समीक्षक व अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे प्रमुख अतिथी व वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध मार्क्सवादी साहित्यचिंतक डॉ. वि. स. जोग राहतील. अहमदनगरचे काम्रेड डॉ. मेहबूब सय्यद, यवतमाळचे प्रा. पुनीत मानकर तसेच वणी येथील डॉ. अजय देशपांडे परिसंवादातील वक्ते आहेत. यावेळी नारायण सुर्वे यांच्या निवडक कवितांचे अभिवाचनही सादर करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास साहित्यप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# सावनेरमधील राम गणेश गडकरी स्मारकाची सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्याकडून पाहणी

### आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी दिली स्मारकाची सविस्तर माहिती, संवर्धन व विकासकामांना चालना मिळण्याची अपेक्षा

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

मराठी साहित्यविश्वातील महान नाटककार व विनोदी लेखक राम गणेश गडकरी यांच्या सावनेर येथील ऐतिहासिक निवासस्थानाला महाराष्ट्राचे इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी भेट देऊन स्मारकाची पाहणी केली. सावनेर-कळमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या उपस्थितीत झालेल्या या पाहणीदरम्यान स्मारकाची सद्यस्थिती, संवर्धन तसेच आवश्यक विकासकामांचा आढावा घेण्यात आला.





सावनेर येथे पोहोचल्यानंतर आशिष शेलार यांनी राम गणेश गडकरी यांच्या स्मृतीला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी आशिष शेलार यांना स्मारक परिसराची पाहणी करून देत गडकरी यांच्या जीवनाशी आणि साहित्यिक कारकिर्दीशी संबंधित विविध ऐतिहासिक बाबींची सविस्तर माहिती दिली. स्मारकात जतन करण्यात आलेल्या गडकरी यांच्या दुर्मिळ छायाचित्रांसह त्यांच्या गाजलेल्या नाटकांतील विविध प्रसंगांची छायाचित्रे व तत्कालीन प्रसिद्ध नाटककारांशी संबंधित साहित्याचीही पाहणी करण्यात आली.

राम गणेश गडकरी हे गोविंदाग्रज आणि बाळकराम या टोपणनावांनी मराठी साहित्यविश्वात प्रसिद्ध होते. मराठीचे शेक्सपियर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडकरी यांच्या जीवनातील अखेरचा काळ सावनेर येथे गेला. २३ जानेवारी १९१९ रोजी वयाच्या अवघ्या ३४व्या वर्षी त्यांनी सावनेरच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. याच निवासस्थानी वास्तव्य करत असताना त्यांनी आपल्या साहित्यिक कारकिर्दीतील महत्त्वपूर्ण लेखन केले. एकच प्याला आणि भावबंधन यांसारख्या अजरामर साहित्यकृतींच्या निर्मितीशी या भूमीचा जवळचा संबंध आहे.

गडकरी वाडा म्हणूनही ओळखले जाणारे हे निवासस्थान सध्या महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाच्या अखत्यारित असून राज्य संरक्षित स्मारक म्हणून त्याचे जतन करण्यात येत आहे. स्मारकाच्या खोल्यांमध्ये राम गणेश गडकरी यांच्या जीवनाशी संबंधित अनेक दुर्मिळ छायाचित्रे व ऐतिहासिक आठवणी जतन करण्यात आल्या आहेत.

यावेळी आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी स्मारकाच्या अधिक विकासासाठी तसेच त्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचे प्रभावी संवर्धन करण्याची गरज व्यक्त केली. सावनेरच्या या ऐतिहासिक ठेव्याला अधिक चांगल्या स्वरूपात विकसित करून साहित्यप्रेमी, पर्यटक आणि नव्या पिढीला या वारशाची ओळख करून देण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या पाहणीच्या वेळी महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री आशिष शेलार यांच्या पाहणीमुळे सावनेरच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाच्या संवर्धनाला तसेच राम गणेश गडकरी स्मारकाच्या विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

थोडक्यात

## आसोली येथे शासकीय योजनांची चर्चा



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

ग्रामपंचायत, आसोली येथे सेवा संकल्प अभियान अंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे तसेच समाज कल्याण नागपूर यांच्यावतीने शासकीय योजनांची चर्चा हा उपक्रम राबविण्यात आला. सदर उपक्रमाचे संचालन ग्रामविकास अधिकारी विद्यासागर कांबळे यांनी केले तर प्रास्ताविक मौदा तालुका समतादूत ओमप्रकाश डोले यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अमित कोडवते होते.सदर उपक्रमात तज्ञ मार्गदर्शक म्हणून उदयसिंह उर्फ गज्जूभाऊ यादव, माजी सभापती, रामटेक तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य उपस्थित होते. चर्चसत्रात गावकऱ्यांनी विविध समस्या मांडल्या त्यावर शासकीय उपाययोजना काय करता येतील याचे मुद्देसूद मार्गदर्शन उदयसिंह उर्फ गज्जूभाऊ यादव यांच्यावतीने करण्यात आले.

यात गावात पाणीटंचाई, मोबाईल टावर, आदिवासी घरकुल योजना, पांदण रस्ते इत्यादी विषयांवर प्रामुख्याने चर्चा करण्यात आली. समतादूत ओमप्रकाश डोले यांनी सामाजिक न्याय विभागाच्या तसेच समाज कल्याण व बार्टीच्या विविध योजनांची माहिती उपस्थितांना दिली व सदर योजनांचे लाभ घेण्याचे आवाहन केले. आभार रामटेक तालुका समतादूत राजेश राठोड यांनी केले. याप्रसंगी समाजसेवक प्रयास ठवरे, माजी सरपंच कडबे, शंकर कडबे, शुद्धोधन नगरारे, आशिष हटवार, विनोद दुरबुडे व आसोली येथील समस्त गावकरी उपस्थित होते.

## स्नेहसदन विशेष विद्यालयात 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत योग व व्यायामाचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

स्थानिक अशी तलारी, रामटेक येथील 'स्नेह सदन मतिमंद मुला-मुलींची विशेष अनिवासी शाळा' येथे 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत विशेष विद्यार्थ्यांसाठी योग, व्यायाम आणि बौद्धिक कक्षातील विविध उपक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. सदर अभियान माननीय आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, पुणे यांच्या आदेशान्वये आणि जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. या उपक्रमात शाळेतील दिव्यांग मुला-मुलींनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. बौद्धिक कक्षातील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या सोबतीने योगासने आणि हलके व्यायाम प्रकार करून शारीरिक व मानसिक आरोग्याचा संदेश दिला. मतिमंद मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्यात सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्यासाठी या विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्नेह सदन विद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंदाने मोलाचे सहकार्य व परिश्रम घेतले. परिसरातील नागरिकांनी आणि पालकांनी या स्तुत्य उपक्रमाचे विशेष कौतुक केले आहे.

# महाज्योती-वनार्टीच्या चाळणी परीक्षेतील तांत्रिक अडथळ्यांची चौकशी

### संबंधित केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र फेरपरीक्षा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) आणि स्व. वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) यांच्यावतीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा तसेच संयुक्त गट-ब व गट-क परीक्षा आणि लष्करातील सैनिक भरती परीक्षापूर्व प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता चाळणी परीक्षा घेण्यात येत आहे. या परीक्षेसाठी राज्यभरातून तब्बल ९० हजार ६०० विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले असून, ३२ शहरांमध्ये ६४ परीक्षा केंद्रांवर परीक्षेचे नियोजन करण्यात आले आहे. दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी परीक्षेदरम्यान पुणे येथील आंबेगाव परिसरातील सन ब्राइट इंग्लिश मिडीयम स्कूल या परीक्षा केंद्रावर काही विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

या तक्रारींची महाज्योती व वनार्टी प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून, संपूर्ण प्रकरणाची वस्तुनिष्ठ चौकशी करण्यात येणार आहे. संबंधित परीक्षा केंद्राचे केंद्र निरीक्षक, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे संबंधित सहायक संचालक तसेच परीक्षा घेणाऱ्या संबंधित एजन्सीकडून घटनेबाबतचा सविस्तर अहवाल मागविण्यात येणार आहे. यासोबतच संबंधित परीक्षा केंद्रावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येणार असून, उपलब्ध तांत्रिक नोंदी व परीक्षा प्रक्रियेचीही पडताळणी केली जाणार आहे. चौकशीअंती संबंधित प्रकरणात कोणाचीही दोषी भूमिका आढळल्यास नियमानुसार संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल.



विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रक्रियेदरम्यान तांत्रिक अडचणींमुळे परीक्षा देता न आलेल्या पात्र विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी नोवा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, बिबेवाडी आणि जे. पी. ऑनलाइन एग्झाम सेंटर, वडगाव बुद्रुक, पुणे येथे घेण्यात येणार आहे. संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र व वेळेबाबत आवश्यक सूचना देण्यात येतील. तसेच, नांदेड येथील मराठवाडा ऑनलाइन एग्झाम सेंटरवर दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा घेणे शक्य झाले नाही. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी ज्ञानदीप शिक्षा प्रसारक मंडळ आणि अंजनगिरी कम्प्युटर बेस्ड सेंटर, अष्टविनायक नगर, नांदेड येथे घेण्यात येणार आहे. या प्रकरणाचीही आवश्यक माहिती व अहवाल प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना समान संधी, पारदर्शक परीक्षा प्रक्रिया आणि कोणत्याही विद्यार्थ्यावर अन्याय होऊ न देणे याला महाज्योती व वनार्टीचे सर्वोच्च प्राधान्य आहे. तांत्रिक अडचणी किंवा प्रशासकीय त्रुटींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे नुकसान होणार नाही, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे, अशी माहिती महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे व वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूरचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी पत्रकारपरिषदेत दिली.

## दुष्काळग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये : प्रकाश जाधव

### सर्व्हर डाऊन असल्याने पंचनाम्यांच्या प्रक्रियेत अडथळे; सरसकट मदत देण्याची माजी खासदारांची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेक विधानसभा मतदारसंघातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून जाहीर झालेल्या मदतीपासून एकही शेतकरी वंचित राहू नये, यासाठी माजी खासदार प्रकाश जाधव यांनी कृषी विभागाकडे निवेदन देत प्रशासनाचे लक्ष वेधले. रामटेक उपविभागीय कृषी अधिकारी यांना हे निवेदन देण्यात आले. यावेळी रामटेक, मौदा पारशिवनी परिसराला कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत जाहीर केली असली तरी पंचनामे करण्याच्या प्रक्रियेत विविध तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. विशेषतः सर्व्हर डाऊन असल्यामुळे सातबारा तसेच Farmer ID उपलब्ध होत नसल्याने पंचनामे करण्याच्या प्रक्रियेला अडथळा येत आहे.



परिणामी केवळ तांत्रिक कारणामुळे पात्र शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रकाश जाधव यांनी प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. दुष्काळग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

**पंचनाम्याची अंतिम मुदत वाढविण्याची मागणी**

निवेदनामध्ये दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे तात्काळ रद्द करून सरसकट मदत जाहीर करावी, पंचनाम्याची अट न ठेवता दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत द्यावी तसेच आवश्यक असल्यास पंचनाम्याची अंतिम मुदत वाढवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच सर्व्हरच्या तांत्रिक अडचणींमुळे कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची शासनाने हमी घ्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**८ ऑक्टोबरपूर्वी पंचनामे शक्य आहेत का ?**

निवेदनात ८ ऑक्टोबर २०२६ ही पंचनाम्याची अंतिम मुदत तात्काळ रद्द करून आवश्यक ती मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सर्व्हरची समस्या कायम असताना अल्पावधीत सर्व शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण करणे शक्य होणार नसल्याचे जाधव यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीचा संवेदनशीलतेने विचार करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक दिलासा देण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली. शेतकरी हा केवळ आकडेवारीचा विषय नाही, तर राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कागदोपत्री प्रक्रिया आणि तांत्रिक अडचणींच्या नावाखाली शेतकरी मदतीपासून वंचित राहता कामा नये,ह्व अशी भूमिका प्रकाश जाधव यांनी मांडली. रामटेक उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या माध्यमातून शासनाकडे या मागण्या तातडीने पोहोचवून सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि दुष्काळग्रस्तांना सरसकट मदत मिळावी, यासाठी प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## अग्रवाल विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत वृद्धाश्रम भेट




**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

येथील स्थानिक शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी व समिती सदस्यांनी अपना घर वृद्धाश्रम सालेकसा येथे भेट दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस. नारायण मूर्ती यांनी वृद्धाश्रमातील आश्रित वृद्धांसोबत हितगूज केले. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सुरु असलेल्या सेवा संकल्प अभियानाद्वारे या वृध्दाश्रमाला भेट देऊन मदत करण्यात आली. वृध्दाश्रमाचे संस्थापक महेंद्र अशोक रंगारी यांनी संपूर्ण वृद्धाश्रमाची कार्यकारणी कथित करून महाविद्यालयानी केलेल्या मदतीसाठी आभार मानले.

रा से यो अधिकारी डॉ एस बिरणवार तसेच समिती सदस्य डॉ. पी. एस. ठाकूर, डॉ जी एस देशमूख , डॉ जी एस ठाकरे डॉ. एस. ए सैय्यद डॉ ए एस भदौरिया यांनी सहकार्य केले. राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत वृध्दाश्रमासाठी भावी सहकार्याचे आश्वासन देण्यात आले.

## जन्म व मृत्यू नोंदणी विभागाच्या कामकाजाचा आयुक्तांकडून आढावा

### प्रलंबित नोंदणीचे काम पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ व रात्रपाळीची ड्युटी लावण्याचे आयुक्तांचे निर्देश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या जन्म व मृत्यू नोंदणी विभागातील कामकाज, नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांमधील अडचणी, CRS Portal संदर्भातील तांत्रिक बाबी, सन २०१६ पूर्वीच्या जन्म-मृत्यू अभिलेखांचे कामकाज, प्रलंबित प्रकरणे तसेच आवश्यक मनुष्यबळ व सुविधांबाबत आढावा बैठक दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी जन्म व मृत्यू नोंदणी विभाग, नागपूर महानगरपालिका येथे मा. आयुक्त डॉ. विपीन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीत जन्म व मृत्यू नोंदणी विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नागरिकांना जन्म व मृत्यू नोंदणी तसेच संबंधित दाखले वेळेत उपलब्ध करून देताना येणाऱ्या अडचणी, CRS Portal वरील तांत्रिक अडचणी, प्रलंबित नोंदणी प्रकरणे आणि सन २०१६ पूर्वीच्या अभिलेखांच्या कामकाजाबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली.

विभागातील प्रलंबित कामाचा निपटारा करून कामाचा भार कमी करण्यासाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासोबतच २४७७ कामकाज तीन पाळ्यांमध्ये राबविण्याचे निर्देश मा. आयुक्तांनी दिले. त्यानुसार सकाळ, दुपार व रात्र अशा तीन पाळ्यांमध्ये कर्मचाऱ्यांची ड्युटी लावून जन्म व मृत्यू नोंदणीचे प्रलंबित काम गतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

उपलब्ध मनुष्यबळाचा योग्य वापर करून नोंदणीचे कामकाज वेळेत पूर्ण करावे, तसेच आवश्यकतेनुसार रात्रपाळीमध्येही कर्मचारी नियुक्त करून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करावा, अशा सूचना मा. आयुक्तांनी दिली. यामुळे प्रलंबित कामाचा भार कमी होऊन एका User ID वरून आवश्यक कामकाज सुरळीतपणे करता येईल, याबाबतही नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच विभागातील तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यासाठी संबंधित यंत्रणेशी समन्वय साधावा, प्रलंबित प्रकरणांचा नियमित आढावा घ्यावा आणि नागरिकांना सेवा देताना अनावश्यक विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

यावेळी मनपाचे आयुक्त डॉ. विपिन, अतिरिक्त आयुक्त (शहर ) अंकीत, अतिरिक्त आयुक्त (सेवा) मुरूगानंथम, वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा निबंधक (जन्म-मृत्यु) डॉ. दीपक सेलोकर, वैद्यकीय अधिकारी तथा उपनिबंधक (जन्म-मृत्यु) डॉ. गोवर्धन नवखरे, जिल्हा परिषद नागपूरचे जिल्हा माता व बाळ सांगोपण अधिकारी डॉ. रेवती साबळे, सांखिकी अधिकारी प्रियंका पवार तसेच महानगरपालिकेचे सर्व जन्म-मृत्यु कर्मचारी व झोनल अधिकारी उपस्थित होते.

## पोलीस पाटलांच्या मागण्यांसाठी हिवाळी अधिवेशनात एकजुटीचे आवाहन

### लातूर जिल्हा कार्याध्यक्ष गुणवंतराव पाटील यांची गोंदियात सदिच्छा भेट; विविध मागण्यांवर चर्चा



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघटनेचे लातूर जिल्हा कार्याध्यक्ष गुणवंतराव पाटील यांनी गोंदिया जिल्हा पोलीस पाटील संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्ष नर्मदा चुटे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी तालुक्यातील पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भेटीदरम्यान राज्यातील पोलीस पाटलांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पोलीस पाटलांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, सेवा-सुविधा तसेच शासनाकडून अपेक्षित असलेल्या मागण्यांबाबत पदाधिकारी व उपस्थित पोलीस पाटलांनी विचारविनिमय केला. यावेळी हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व पोलीस पाटील संघटनांनी एकत्रित येऊन शासनाकडे आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी प्रभावीपणे पाठपुरावा करावा, असे आवाहन गुणवंतराव पाटील यांनी केले.

पोलीस पाटलांच्या प्रमुख मागण्यांमध्ये सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षांवरून ६५ वर्षे करण्यात यावे, सेवानिवृत्तीनंतर पेन्शनची सुविधा लागू करण्यात यावी अथवा एकरकमी २० लाख रुपये देण्यात यावेत, नूतनीकरणाची प्रक्रिया बंद करण्यात यावी, तसेच पोलीस पाटलांच्या हिताच्या इतर प्रलंबित मागण्यांचा समावेश आहे. ग्रामीण भागात कायदा व सुव्यवस्था राखण्यासह प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वय साधण्याचे महत्त्वपूर्ण काम पोलीस पाटील करीत असतात. त्यामुळे त्यांच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन त्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या सदिच्छा भेटीमुळे गोंदिया व लातूर जिल्ह्यातील पोलीस पाटील संघटनांमध्ये समन्वय वाढवून आगामी काळात विविध मागण्यांसाठी एकत्रितपणे लढा उभारण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

## रामटेक शहरातील नागरी समस्यांवर माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांचे निवेदन

### नगर परिषदेकडे पाच प्रमुख मागण्या, तातडीने कार्यवाही करण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेक शहर व गडमंदिर परिसरातील विविध नागरी समस्यांकडे नगर परिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांनी बुधवार, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी नगराध्यक्ष तथा मुख्याधिकारी, नगर परिषद रामटेक यांना निवेदन सादर केले. नागरिकांच्या सोयी-सुविधांसाठी प्रलंबित प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करून कार्यवाही करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. निवेदनात पाच प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे कायमस्वरूपी प्रकाश व्यवस्था : छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात रात्रीच्या वेळी अंधाराचे वातावरण असते. मागील आठ वर्षांपासून प्रलंबित असलेली समस्या दूर करून येथे कायमस्वरूपी लाईटिंगची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

क्रीडा नेहरू मैदानाची योग्य देखभाल : क्रीडा नेहरू मैदानासाठी महाराष्ट्र



शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात आला आहे. मात्र, मैदानात मोकाट जनावरे फिरत असून देखभाल व्यवस्थेकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याने मैदानाची योग्य निगा राखावी व आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

गडमंदिर परिसरातील रस्त्यांवर पथदिवे : रामटेक डिअर पार्क येथील श्री लक्ष्मणजी द्वारापासून गडमंदिराकडे जाणारा मार्ग तसेच जैन मंदिराकडे जाणाऱ्या गडावरील रस्त्यावर पथदिव्यांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

श्रीराम मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम : श्रीराम मंदिर गडावर भाविकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्या तसेच मंदिर परिसरात प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, ग्लास व इतर कचरा साचत असल्याने नियमित स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

राखी तलाव परिसर स्वच्छ ठेवून अनधिकृत वापरास प्रतिबंध : राखी तलाव परिसर स्वच्छ ठेवावा तसेच तलाव परिसराला लागून असलेल्या स्टार पर्यटन जनसुविधा केंद्राचा अनधिकृत वापर बंद करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. या पाचही मागण्यांवर नगर परिषद प्रशासनाने विलंब न करता तातडीने कार्यवाही करून त्याबाबतची माहिती द्यावी, अशी मागणी माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांनी केली.

यावेळी रजत गजभिये, अध्यक्ष भाजपा रामटेक तथा नगरसेवक रामटेक, प्रभाकर खेडकर, नगरसेवक; लक्ष्मी अहिरकर, नगरसेविका; विजय शुक्ला, व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# ३६ गावांचा पाणीपुरवठा वीजबिलाच्या थकबाकीमुळे ठप्प ?

## बनगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे सुमारे ५० लाख रुपयांचे वीजबिल थकीत; नागरिकांची पाण्यासाठी पायपीट





**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

बनगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे सुमारे ५० लाख रुपयांचे वीजबिल थकीत असल्याने या योजनेचा विद्युतपुरवठा खंडित करण्यात आला आहे. परिणामी मागील काही दिवसांपासून ३६ गावांचा पाणीपुरवठा ठप्प झाला असून, या गावांतील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत आहे. पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू करण्यात यावी, अशी मागणी संबंधित गावांतील नागरिकांनी केली आहे.

बनगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे वीजबिल थकीत असल्याने महावितरणकडून विद्युतपुरवठा खंडित करण्यात आला. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून ३६ गावांना पाणीपुरवठा करता आलेला नाही. परिणामी ऐन गरजेच्या काळात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दूरवर जावे लागत असून, महिलांसह ज्येष्ठ नागरिकांचे मोठे हाल होत आहेत.

**वीजबिल थकीत, त्यामुळे पाणीपुरवठा बंद**

या पाणीपुरवठा योजनेचे देखभाल-दुरुस्तीचे काम तसेच वीजबिल थकीत असल्याने पाणीपुरवठा बंद पडल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दरमहा वीजबिल मोठ्या प्रमाणात येत असतानाही त्याची वेळेत पूर्तता होत नसल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. थकीत वीजबिलाचा भार वाढत गेल्याने अखेर विद्युतपुरवठा खंडित करण्यात आला.

पाणीपुरवठा योजनेचे वीजबिल वेळेत भरले जात नसल्याने यापूर्वीही अनेकदा पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला असल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे कायमस्वरूपी तोडगा काढून योजना सुरळीतपणे सुरू ठेवण्याची मागणी होत आहे.

**पाणीपट्टी वसुलीवरही प्रश्नचिन्ह**

या योजनेअंतर्गत नागरिकांकडून पाणीपट्टी कराची वसुली केली जाते. मात्र, नगर परिषदेकडून पाणीपट्टी कराची अपेक्षित वसुली होत नसल्यामुळे पाणीपुरवठा विभागाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणे आणि थकीत वीजबिलाचा प्रश्न तातडीने मार्गी लावणे आवश्यक आहे. दरम्यान, पाणीपुरवठा विभागाकडून मिळणाऱ्या वीजदेयकाच्या दरातही वाढ झाल्याचे सांगण्यात येत आहे. पूर्वीच्या तुलनेत वीजदर वाढल्याने योजनेच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे. परिणामी थकीत वीजबिलाचा आकडा वाढत असून, त्याचा थेट परिणाम पाणीपुरवठ्यावर होत आहे.

**प्रति युनिट वीजदर वाढल्याने खर्चाचा बोजा**

योजनेवरील वीजबिलाचा भार वाढण्यामागे वीजदरातील वाढ हेही एक कारण असल्याचे सांगितले जाते. यापूर्वी प्रति युनिट सुमारे १४.२० रुपये असलेला दर आता २४.२० रुपये प्रति युनिट झाल्याने पाणीपुरवठा योजनेच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे नियमित वीजबिल भरणे कठीण होत असल्याचे संबंधितांकडून सांगण्यात येते.

**तातडीने वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी**

३६ गावांचा पाणीपुरवठा बंद असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. पिण्याचे पाणी ही नागरिकांची अत्यावश्यक गरज असल्याने वीजबिलाच्या थकबाकीमुळे संपूर्ण पाणीपुरवठा बंद ठेवणे योग्य नाही, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

शासन व संबंधित प्रशासनाने हस्तक्षेप करून थकीत वीजबिलाचा प्रश्न तातडीने सोडवावा, विद्युतपुरवठा पूर्ववत करून बनगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तात्काळ सुरू करावी, तसेच भविष्यात वीजबिल थकून पुन्हा पाणीपुरवठा बंद होणार नाही, यासाठी कायमस्वरूपी आर्थिक नियोजन करावे, अशी मागणी ३६ गावांतील नागरिकांनी केली आहे.

---

थोडक्यात

## हजरत बाबा सैय्यद लष्कर शाह शहीद दर्ग्याच्या सालाना उर्सला आजपासून प्रारंभ

### गुस्ल-ए-मजारने उर्सला सुरुवात, तीन दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

तालुक्यातील खापा येथील पर्यटन स्थळाचा 'क' दर्जा प्राप्त प्रसिद्ध हजरत बाबा सैय्यद लष्कर शाह शहीद रहमतुल्लाह अलैह (गडी किल्ला) यांच्या दर्गा येथे वार्षिक उर्सला आज, गुरुवार दि. ८ ऑक्टोबरपासून प्रारंभ होत आहे. उर्सनिमित्त तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम, संदल शरीफ, कुल शरीफ तसेच नामवंत कव्वालांच्या कव्वालीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. उर्सच्या प्रारंभानिमित्त गुरुवार दि. ८ ऑक्टोबर रोजी रात्री १.५५ वाजता 'गुस्ल-ए-मजार'चा (तीर्थ) पवित्र कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाने उर्सच्या धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात होणार असून दर्गा परिसरात भाविकांच्या स्वागतासाठी तसेच उर्सच्या विविध कार्यक्रमांसाठी आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे. शुक्रवार दि. ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता 'परचम कुशाई' (झेंडा वंदन)चा कार्यक्रम होणार आहे. अँडव्होकेट हाजी आसिफ शौकत कुरेशी व नगराध्यक्ष पियुष बुरडे यांच्या हस्ते, नयन राजू गिरपूंजे यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम होणार आहे.



त्यानंतर सायंकाळी ४ वाजता संदल शरीफची मिरवणूक काढण्यात येणार आहे. हजरत बाबा सैय्यद लष्कर शाह शहीद दर्गा शरीफ येथून संदल शरीफची मिरवणूक निघून शहरातील प्रमुख मार्गांवरून भ्रमण करीत पुन्हा दर्गा शरीफ येथे पोहोचेल. रात्री ७ वाजता कव्वालीचा कार्यक्रम होणार असून राजस्थानातील कपासन येथील नुसरत कादरी तसेच उत्तर प्रदेशातील शब्बू शादाब कव्वाली सादर करणार आहेत. शनिवार दि. १० ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता कुल शरीफचा कार्यक्रम होणार आहे. रात्री ७ वाजता राजस्थानातील कपासन येथील सदाकत साबरी व मुंबई येथील अदनान अजीम नाजा यांच्या कव्वालीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. उर्सदरम्यान दि. ८ ते ११ ऑक्टोबरपर्यंत सकाळ-संध्याकाळ लंगर सुरू राहणार आहे. भाविकांच्या सोयीसाठी दरगाह कमेटीतर्फे आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

**"दरगाह कमेटीतर्फे भाविकांना उपस्थितीचे आवाहन"**

उर्सचे आयोजन हजरत बाबा सैय्यद लष्कर शाह शहीद रहमतुल्लाह अलैह (गडी किल्ला) दरगाह कमेटी, खापा यांच्या वतीने करण्यात आले आहे. कमेटीचे अध्यक्ष हाजी अल्ताफ (बब्लू) दद्दा शेख, उपाध्यक्ष प्यारू गफूर शेख, सचिव साकीर सत्तार शेख, सहसचिव फिरोज इस्माईल (बब्बू) शेख, कोषाध्यक्ष युनुस सत्तार कुरेशी, सहकोषाध्यक्ष फिरोज (गुड्डु) बब्बू खा पठाण तसेच सदस्य आसिफ हबीब शेख, असलम बब्बू शाह, साहिल शब्बीर शेख, कशिफ मुस्ताक सुभेदार व जाकीर रशिद शाह यांनी उर्सच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले आहेत. उर्सनिमित्त खापा शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन दरगाह कमेटीतर्फे करण्यात आले आहे.

## २६५ दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या पार्श्वभूमीवर अधिकारी-कर्मचाऱ्यांना मूळ आस्थापनेवर पाठवण्याची मागणी

### मंत्री कार्यालयात अधिकारी, मग जनतेची कामे कोण करणार : मुंदाफळे, सामाजिक कार्यकर्ते

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाने दि. २५ ऑगस्ट रोजी, जारी केलेल्या परिपत्रकानुसार मंत्री व राज्यमंत्र्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची माहिती घेऊन, आवश्यकते नुसार त्यांना त्यांच्या मूळ आस्थापनेवर परत पाठविण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील प्रशासनाच्या कार्यक्षमते बाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. राज्यात २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर दुष्काळ निवारण, पाणीपुरवठा, महसूल, शेती, रोजगार, पंचनामा, मदत व विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी यासाठी स्थानिक पातळीवर सक्षम अधिकारी उपलब्ध असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र, विविध शासकीय विभागातील अधिकारी- कर्मचारी मंत्री व राज्यमंत्र्यांच्या कार्यालयात प्रतिनियुक्तीवर अथवा अन्य स्वरूपात कार्यरत असल्यास, त्यांच्या मूळ आस्थापनेवरील मनुष्यबळ आणि प्रशासकीय कामकाजावर त्याचा परिणाम होतो का? याची शासनाने स्पष्टपणे माहिती जनतेसमोर ठेवणे आवश्यक आहे.



**थेट सवाल शासनाला!**

मंत्री कार्यालयातील कामांसाठी अधिकारी उपलब्ध आहेत; मग सामान्य जनतेच्या कामांसाठी अधिकारी कुठे आहेत? दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी, नागरिक आणि स्थानिक प्रशासनाला तातडीने सेवा देणे आवश्यक असताना, महत्त्वाच्या पदांवरील अधिकारी मूळ विभागाबाहेर कार्यरत ठेवण्याची आवश्यकता काय आहे?

**प्रमुख मागण्या :** मंत्री व राज्यमंत्र्यांच्या कार्यालयात प्रतिनियुक्तीवर कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांची विभागनिहाय संख्या जाहीर करावी. उपजिल्हाधिकार, तहसीलदार तसेच इतर महत्त्वाच्या प्रशासकीय पदांवरील अधिकारी मूळ आस्थापनेवर उपलब्ध आहेत की नाहीत, याची तपासणी करावी. ज्या अधिकारी- कर्मचाऱ्यांची मंत्री कार्यालयातील सेवा अत्यावश्यक नाही, त्यांना तातडीने मूळ आस्थापनेवर पाठवावे. दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये आवश्यकतेनुसार अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढवावी. प्रतिनियुक्तीमुळे कोणत्याही तालुक्यातील महसूल, दुष्काळ निवारण किंवा जनतेच्या शासकीय कामांवर परिणाम होत असल्यास त्याची जबाबदारी निश्चित करावी. शासनाने दि. २५ ऑगस्ट २०२६ च्या परिपत्रकाच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती सार्वजनिक करावी. जनतेला अधिकारी कार्यालयात हवेत, केवळ फाईलवर नाहीत! दुष्काळाच्या काळात प्रशासनाचा प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी जनतेच्या सेवेसाठी उपलब्ध राहणे आवश्यक आहे. त्यामुळे मंत्री व राज्यमंत्र्यांच्या कार्यालयातील अतिरिक्त अथवा अनावश्यक प्रति नियुक्त्या तातडीने पुनरावलोकन करून संबंधित अधिकारी- कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ आस्थापनेवर पाठविण्याचीकार्यवाही शासनाने करावी.

---

# संविधान चौक विधानभवन परिसरात समाविष्ट करण्यास समता सैनिक दलाचा तीव्र विरोध

## ऐतिहासिक आंदोलनस्थळाचे सार्वजनिक व लोकशाही स्वरूप कायम ठेवण्याची मागणी; प्रशासनाला निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेने विधानभवन परिसराच्या विस्तारासाठी संविधान चौकाजवळील सुमारे १८ मीटर रुंदीचा सार्वजनिक रस्ता बंद करण्याबाबत मांडलेल्या प्रस्तावाला समता सैनिक दलाने तीव्र विरोध दर्शविला आहे. या प्रस्तावामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासह संविधान चौकाचे ऐतिहासिक, सामाजिक व लोकशाही महत्त्व बाधित होण्याची शक्यता असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

या संदर्भात समता सैनिक दलाच्यावतीने सोमवार, ५ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी तसेच नागपूर महानगरपालिका आयुक्तांना निवेदन सादर करून प्रस्ताव तातडीने रद्द करण्याची मागणी करण्यात आली. संविधान चौकाचे सध्याचे सार्वजनिक, खुले व लोकशाही स्वरूप कायम ठेवावे, तसेच कोणताही निर्णय घेण्यापूर्वी आंबेडकरी व बौद्ध समाजातील प्रतिनिधी आणि संबंधित सामाजिक संघटनांशी चर्चा करावी, अशी मागणीही करण्यात आली.

समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अतिरिक्त महासचिव अमर दीपांकर यांनी सांगितले की, संविधान चौक हा केवळ वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा चौक नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा, भारतीय संविधानाचा, सामाजिक न्यायाचा आणि लोकशाही संघर्षाचा महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू आहे. विविध वंचित घटकांकडून अन्याय, अत्याचार व मानवाधिकारांच्या प्रश्नांविरोधात याच ठिकाणी लोकशाही मार्गाने आवाज उठविला जातो. त्यामुळे या स्थळाचे ऐतिहासिक व संवैधानिक महत्त्व अबाधित ठेवणे आवश्यक आहे.

विधानभवनाचा आवश्यक विकास किंवा विस्तार करण्यास संघटनेचा विरोध नाही; मात्र त्यासाठी संविधान चौकाचे महत्त्व धोक्यात न आणता पर्यायी मार्ग, जागा आणि नियोजनाचा विचार करावा, अशी भूमिका समता सैनिक दलाने घेतली आहे.

यावेळी राष्ट्रीय अतिरिक्त महासचिव अमर दीपांकर, राष्ट्रीय प्रशिक्षण प्रमुख संघप्रिय नाग (लाडे), वरिष्ठ कमांडर व कॅम्प प्रमुख पृथ्वी मोटघरे, नागपूर जिल्हा जीओसी प्रमोद खांडेकर, मयूरनगर शाखाप्रमुख चंद्रप्रकाश देशभ्रतार यांच्यासह पदाधिकारी व सैनिक उपस्थित होते. राष्ट्रीय अध्यक्ष डी. एफ. कोचे, मुख्य मार्गदर्शक भदंत नाग दीपांकर आणि राष्ट्रीय जीओसी डॉ. प्रदीप डोंगरे यांनीही या प्रस्तावाला विरोध दर्शविला आहे.

प्रशासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास लोकशाही व संवैधानिक मार्गाने आंदोलन तीव्र करण्याचा इशारा समता सैनिक दलाने दिला असून, गरज भासल्यास संपूर्ण महाराष्ट्रात व्यापक आंदोलन उभारण्यात येईल, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. संविधान चौकाचे ऐतिहासिक, सामाजिक व लोकशाही स्वरूप अबाधित ठेवून प्रस्तावाचा फेरविचार करावा, अशी ठाम मागणी संघटनेने केली आहे. असे राष्ट्रीय अतिरिक्त महासचिव अमर दिपांकर यांनी कळविले.

---

# प्रधानमंत्री आवास योजनेचा निधी रखडला, लाभार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष

## पहिला व दुसरा टप्पा पूर्ण, अंतिम टप्प्यातील निधीच्या प्रतीक्षेत अपूर्ण घरकुले, राष्ट्रीय पोर्टल बंद असल्याचे प्रशासनाचे कारण

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आमगाव नगरपरिषद हद्दीत समाविष्ट सात गावांमधील प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना शासनाच्या निधीची प्रतीक्षा करावी लागत असल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. अनेक लाभार्थ्यांनी शासनाच्या योजनेअंतर्गत घरकुलाचे बांधकाम सुरू करून पहिला व दुसरा टप्पा पूर्ण केला आहे. मात्र, अंतिम टप्प्यातील निधी उपलब्ध न झाल्याने अनेक घरकुलांची बांधकामे अर्धवट अवस्थेत पडून आहेत.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना हक्काचे पक्के घर मिळावे, या उद्देशाने घरकुल बांधकामासाठी टप्प्याटप्प्याने निधी वितरित केला जातो. त्यानुसार लाभार्थ्यांनी उपलब्ध झालेल्या निधीतून घरांचे बांधकाम सुरू केले. पहिला व दुसरा टप्प्यातील बांधकाम पूर्ण केल्यानंतर आता अंतिम टप्प्यातील निधी मिळणे अपेक्षित असताना तो रखडल्याने लाभार्थ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे.

**अर्धवट घरकुलांमुळे लाभार्थ्यांची कोंडी**

अनेक लाभार्थ्यांनी घराचे बांधकाम सुरू करण्यासाठी स्वतःकडील बचत, उसनवारी तसेच कर्जाचा आधार घेतला आहे. मात्र, पुढील टप्प्यातील शासनाचा निधी मिळत नसल्याने बांधकाम पूर्ण करणे कठीण झाले आहे. काही ठिकाणी घरांच्या भिंती उभारण्यात आल्या आहेत, तर काही घरांवर छताचे किंवा अंतिम स्वरूपाचे काम बाकी आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना अपूर्ण घरात वास्तव्य करणे शक्य नसून जुन्या किंवा भाड्याच्या घरातच राहावे लागत आहे.

**निधी मिळेल या आशेवर घराचे काम सुरू केले : कमलेश्वर ठाकरे**

प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभार्थी कमलेश्वर ठाकरे यांनी आपली व्यथा व्यक्त करताना सांगितले की, शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेत आपले घर पूर्ण होईल, या विश्वासाने घराचे बांधकाम सुरू केले. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील निधी मिळाल्यानंतर त्याचा उपयोग करून बांधकाम पुढे नेले. आता अंतिम टप्प्यातील निधी मिळणे बाकी आहे. निधी मिळाल्याशिवाय घराचे उर्वरित बांधकाम पूर्ण करणे आर्थिकदृष्ट्या कठीण आहे. घर लवकर पूर्ण करून कुटुंबासह त्यात राहता यावे, अशी आमची अपेक्षा आहे. प्रशासनाने आमच्या अडचणी लक्षात घेऊन प्रलंबित निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा.



ठाकरे यांच्या म्हणण्यानुसार, घरकुलाचे बांधकाम अपूर्ण राहिल्याने लाभार्थ्यांना आर्थिक अडचणींसोबतच मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे निधी वितरणाची प्रक्रिया विनाविलंब पूर्ण होणे आवश्यक आहे.

**राष्ट्रीय पोर्टल बंद असल्याचे प्रशासनाचे स्पष्टीकरण**

निधी रखडल्याबाबत संबंधित नगरपरिषद प्रशासनाकडे लाभार्थ्यांनी वारंवार पाठपुरावा केला असता, प्रधानमंत्री आवास योजनेचे राष्ट्रीय पोर्टल मागील सुमारे महिनाभरापासून बंद असल्याचे कारण प्रशासनाकडून सांगण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे. पोर्टल बंद असल्यामुळे अंतिम टप्प्यातील निधी वितरणाची प्रक्रिया रखडल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात येत आहे.

मात्र, राष्ट्रीय स्तरावरील पोर्टल नेमके कोणत्या कारणामुळे बंद आहे, ते कधी सुरू होणार आणि पोर्टल सुरू झाल्यानंतर प्रलंबित निधी किती कालावधीत लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने लाभार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

**पोर्टल बंद असण्यामागचे कारण स्पष्ट करण्याची मागणी**

एकीकडे शासनाकडून गरजू नागरिकांना पक्के घर देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेसारख्या महत्त्वाकांक्षी योजना राबविल्या जात आहेत; तर दुसरीकडे प्रत्यक्ष लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम निधीअभावी अपूर्ण राहात असल्याने योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. पोर्टल बंद असल्यास त्यामागील तांत्रिक अथवा प्रशासकीय कारण काय आहे, याची माहिती लाभार्थ्यांना देणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

**तातडीने पोर्टल सुरू करून निधी वितरित करण्याची मागणी**

प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी नगर परिषद संघर्ष समितीचे सामाजिक कार्यकर्ते यशवंत मानकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक हुकूम बोहरे तसेच ग्रामीणचे उपसरपंच सुधीरजी पटले यांनी केली आहे.

राष्ट्रीय पोर्टल तातडीने सुरू करण्यासाठी संबंधित वरिष्ठ विभागाशी संपर्क साधून प्रलंबित प्रकरणांची कार्यवाही पूर्ण करावी. पहिला व दुसरा टप्पा पूर्ण केलेल्या पात्र लाभार्थ्यांना अंतिम टप्प्यातील निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच निधी वितरणास विलंब होण्यामागील कारणे स्पष्ट करून लाभार्थ्यांना निश्चित माहिती देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

अनेक कुटुंबांचे घरकुलाचे बांधकाम निधीअभावी अर्धवट राहिले असून, हक्काचे घर पूर्ण होण्याची प्रतीक्षा लाभार्थी करीत आहेत. त्यामुळे प्रशासनाने या प्रश्नाकडे केवळ तांत्रिक बाब म्हणून न पाहता तातडीने कार्यवाही करून लाभार्थ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

> घर पूर्ण होईल या आशेने पहिल्या दोन टप्प्यात मिळालेल्या निधीतून बांधकाम केले. आता अंतिम टप्प्यातील निधी रखडल्याने घराचे काम अर्धवट आहे. कुटुंबासह स्वतःच्या घरात राहण्याचे स्वप्न केव्हा पूर्ण होणार, हा प्रश्न आहे. प्रशासनाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा.
>
> **- रामलाल ठाकरे, जेष्ठ नागरिक**

